रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ३९
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## केंद्राचा दिलासा! गव्हाच्या निर्यातीवरील बंदी उठवली



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने गहू निर्यातीबाबत मोठा निर्णय घेतला आहे. डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेड (डीजीएफटी)कडून जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार भारताने गहू निर्यातीवरील दीर्घकाळापासून असलेले निर्बंध हटवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ड्युरम गहू, गव्हाचे पीठ आणि संबंधित उत्पादनांच्या निर्यातीला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. भारताकडून गहू निर्यातीला परवानगी मिळाल्याने आगामी काळात जागतिक बाजारातील गव्हाचा पुरवठा वाढण्याची चिन्हे आहेत. भारताने यापूर्वी फेब्रुवारी २०२६मध्ये मर्यादित प्रमाणात गहू निर्यातीला परवानगी दिली होती. त्यानंतर सरकारने उत्पादन, उपलब्ध साठा आणि देशांतर्गत किमतींचा आढावा घेत निर्यातीला टप्प्याटप्प्याने परवानगी दिली. नव्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ वाढण्यासोबतच उत्पादनाला चांगला दर मिळण्याची संधी आहे.

### अंतरंग

कर्जतमध्ये कारच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू/२
तीन किलो गांजासह एकाला अटक/५
भारताचा पहिला डाव पाचशेपार; ध्रुवचे शतक/८

# कर्जमुक्तीच्या लाभाचे शेतकऱ्यांना वितरण

## दुसऱ्या टप्प्यात ६,३६,०३६ जणांना ५०८६ कोटींचे वाटप

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील इतर सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.



पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने सुरू असून आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

### विभागनिहाय लाभ

- अमरावती : १,४५,८०८ शेतकऱ्यांना ₹१,२०८ कोटींचा लाभ
- नाशिक : ८४,८१३ शेतकऱ्यांना ₹७५६ कोटींचा लाभ
- छत्रपती संभाजीनगर : ३,०२,२७३ शेतकऱ्यांना ₹२,२८४ कोटींचा लाभ
- पुणे : ४९,२२४ शेतकऱ्यांना ₹४१७ कोटींचा लाभ
- नागपूर : ४४,८६४ शेतकऱ्यांना ₹३६६ कोटींचा लाभ
- कोकण : ९,५४ शेतकऱ्यांना ₹५४ कोटींचा लाभ



# शेतकरी नेते पंकज तांबे भाजपमध्ये

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

**माणगाव : बातमीदार**



काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष तथा शेतकरी नेते पंकज तांबे यांनी सोमवारी (दि.२४) सहकारी कार्यकर्त्यांसह मुंबई येथील भाजपच्या पक्ष कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली 'कमळ' हाती घेतले. या प्रवेशामुळे माणगावसह दक्षिण रायगडात भाजपची ताकद अधिक वाढणार आहे.

यावेळी माणगाव तालुक्यातील निजामपूर, विळे, पळसगाव, इंदापूर भागातील अनेक सहकारी कार्यकर्ते मुंबई येथे भाजप कार्यालयात उत्साही वातावरणात दाखल झाले होते. यामध्ये स्वप्नील शिर्के, वावे दिवाळी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शरद कदम, निळज ग्रामपंचायत माजी सरपंच प्रमोद जाधव, शिरवली ग्रामपंचायत माजी सरपंच विजय नलावडे, सणसवाडी ग्रामपंचायत माजी सदस्य सय्याजी नलावडे, ॲड. रूपेश वाढवळ, सुनील अर्बन, कुमार अर्बन, योगेश ढवळे, मयूर अर्बन, आनंद मोरे, गजानन चव्हाण, प्रकाश शिंदे, प्रताप कडू आदींचा समावेश होता. या सर्वांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश आणि राज्य अधिकाधिक प्रगती करीत आहे. पंकज तांबे यांच्या पक्षप्रवेशामुळे निश्चितच माणगाव तालुक्यात भाजपची ताकद वाढणार आहे. सर्वांनी एकत्रपणे काम करा आणि पक्ष अधिक बळकट करा.

आमदार प्रवीण दरेकर यांनीही दक्षिण रायगडात या पक्षप्रवेशामुळे भाजपचे बळ वाढणार असून जनतेच्या समस्या सोडवून पक्षवाढीसाठी कार्यरत राहा, असे सूचित केले.

कार्यक्रमास भाजप नेते बापूसाहेब सोनगिरी, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष सीताराम उभारे, जिल्हा चिटणीस गोविंद कासार, भाजप तालुकाध्यक्ष युवराज मुंढे, सरचिटणीस निलेश राशीनकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष मंदार महामुनकर, सरचिटणीस अरविंद उभारे, गोरेगाव शहराध्यक्ष किशोर रातवडकर, नागाव सरपंच यशवंत कासरेकर, मारुती कासरेकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# अमरावतीमधील रुग्णालयात भीषण आग

## तीन बाळांचा होरपळून मृत्यू



**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावती शहरातील जिल्हा महिला रुग्णालयाच्या नवजात अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) सोमवारी (दि.२४) पहाटे भीषण आग लागून तीन बालकांचा मृत्यू झाला. व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे.

याबाबत माहिती देताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी सांगितले की, एनआयसीयूच्या बाह्यरुग्ण विभागात पहाटे साडेतीनच्या सुमारास आग लागली. या आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. याबाबत कळताच रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले. ही घटना घडली तेव्हा या कक्षात नऊ बालके होती, मात्र तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर इतर सहा बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

दरम्यान, एनआयसीयू विभागात दाखल असणाऱ्या सर्व बालकांना घटनेनंतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे, तर काही बालकांना शहरातील खासगी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

### मदत आणि चौकशीचे आदेश

या घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त करून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश राज्याच्या आरोग्य प्रशासनाला दिले आहेत तसेच मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. जखमी बालकांवर शासकीय खर्चाने उपचार करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सरकार पीडित कुटुंबांना सर्व आवश्यक मदत पुरवेल, असे आश्वस्त केले आहे, तर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरही घटनेवर लक्ष ठेवून आहेत.

## मुंबईत बाप्पाच्या आगमन मिरवणुकीवर फेकली अंडी

**मुंबई** : येथील माझगावचा मौर्य गणपती मंडळाच्या बाप्पाच्या आगमन मिरवणुकीवर शेजारील एका इमारतीमधून अंडी फेकण्यात आल्याचा गंभीर आरोप मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे दोन गटांमध्ये वाद होऊन परिसरात काही काळ मोठा तणाव निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

मंडळाचे उपसचिव विवेक राणे यांनी दिलेल्या माहितीनुसार मंडळाकडून वाजतगाजत बाप्पाची आगमन मिरवणूक काढण्यात येत होती. मंडपापासून अवघ्या ३० ते ४० मीटर अंतरावर असलेल्या एका इमारतीमधून काही समाजकंटकांनी मिरवणुकीच्या दिशेने अंडी भिरकावली. त्यांच्यावर पोलिसांनी कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## निवडक

### ज्येष्ठ मराठी व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांचे निधन

**पुणे** : मराठी भाषा, व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या क्षेत्रात आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या ज्येष्ठ लेखिका, प्राध्यापिका आणि व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांचे सोमवारी (दि.२४) वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या १०१व्या वर्षी त्यांनी पुण्यातील वृद्धाश्रमात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य, व्याकरण आणि शिक्षण वर्तुळात एक पोकळी निर्माण झाली आहे.

### एमसीएसह ११ आस्थापनांचे परवाने एफडीएकडून निलंबित

**मुंबई** : तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात राज्यभर अन्न आणि औषध प्रशासनाची धडक कारवाई सुरू आहे. याअंतर्गत राज्यात एकूण ४४ हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि धाबे यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ३३ आस्थापनांना सुधारणा नोटीस देऊन ११ आस्थापनांचे परवाने निलंबन करण्याची कारवाई करण्यात आली. यामध्ये मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या परमिट रूमचा अन्न परवानाही निलंबित करण्यात आला आहे.

## नागपुरात मध्यरात्री क्लोरीन गॅसची गळती

**नागपूर : प्रतिनिधी**

येथील मानकापूर परिसरातील कलेक्टर कॉलनीजवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वॉटर ट्रीटमेंट प्लांटमध्ये क्लोरीन गॅस सिलिंडरमधून सोमवारी (दि.२४) पहाटे गळती झाल्याने परिसरात खळबळ उडाली. गॅसच्या संपर्कात आल्याने अनेक नागरिकांना श्वास घेण्यास त्रास झाला. काहींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी आठ जणांची प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. यात दोन लहान मुलांचाही समावेश आहे.

### आठ जण आयसीयूमध्ये

नागपूर शहरालगत गोधनी नगर परिषदेच्या हद्दीतील प्लांटमध्ये पहाटेच्या सुमारास क्लोरीन गॅसची गळती सुरू झाली. प्लांटमधील ९०० किलो क्षमतेच्या क्लोरीन गॅस सिलिंडरमधून ही गळती झाल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक गॅसचा प्रभाव वाढल्याने परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ आणि अस्वस्थता जाणवू लागली. त्यानंतर अनेकांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. "रात्री काळ आला होता, मात्र वेळ आली नव्हती," अशी भावना बचावलेल्या नागरिकांनी व्यक्त केली. या घटनेमुळे भोपाळ गॅस दुर्घटनेच्या आठवणी ताज्या झाल्याचेही नागरिकांनी म्हटले आहे.

# राजिप कृषी विभागाकडून प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा सोमवारी (दि. २४) आयोजित करण्यात आला होता. यावेळी एकूण ३६ शेतकऱ्यांना विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि १४ प्रगतशील शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडा, ज्योती नागावकर, नलिनी लोखंडे, माणगाव पंचायत समिती सभापती विलास शिंदे, जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, पुरस्कारप्राप्त शेतकरी, इतर अधिकारी उपस्थित होते.



प्रथम कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. यामध्ये महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण योजनेची सविस्तर माहिती देऊन या योजनेचा लाभ महिला शेतकऱ्यांनी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांमुळेच आज आपण सुखाने दोन घास खाऊ शकत आहोत. रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजना प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. सध्याच्या काळात शेतकऱ्यांनीही आधुनिकतेसह सेंद्रिय खताचा वापर करणे आवश्यक आहे. यासाठी जे सहकार्य लागेल ते रायगड जिल्हा परिषदेकडून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, आपला रायगड हा कृषिप्रधान जिल्हा आहे. येथील शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठीचे सर्व प्रयत्न जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहेत. (पान २ वर..)

### एफएफएस मोहिमेचा शुभारंभ

केंद्र शासनाच्या कृषी विभागाकडून रायगड जिल्ह्यात खत खरेदी व विक्रीसाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएस) ही प्रणाली लागू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खताचा साठा उपलब्ध आहे की नाही याची खातरजमा करण्यासाठी कृषी केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व पैसा दोन्ही वाया जायचे. आता शेतकऱ्यांना आपल्या मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून घरी बसून स्वतःच्या आवश्यकतेप्रमाणे व हव्या त्या खत विक्रेत्याकडून युरिया सुफला डीएपी व इतर अनुदानित खताची खरेदी करता येणार आहे. या मोहिमेचा शुभारंभ यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा मुख्यमंत्र्यांकडून गौरव

## कॅम्पस कनेक्ट मोहिमेसंदर्भात पत्र प्रदान



**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांचे परिसर नशामुक्त करण्याच्या उद्देशाने 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना सर्वत्र राबवली जात आहे. याअंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निशा नायर यांना नेरूळ येथे नवी मुंबई पोलिसांच्या नशामुक्त अभियानांतर्गत 'कॅम्पस कनेक्ट' या उपक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांना पत्र लिहिले होते. नेरूळ येथे 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रमादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात तीन मुख्याध्यापकांना हे पत्र प्रदान करण्यात आले.

नशामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जनजागृती करणे, विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि नशामुक्त नवी मुंबई अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीत सक्रिय सहभाग नोंदवणे या त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यात आली. यामुळे शैक्षणिक क्षेत्रातून नशामुक्त समाजनिर्मितीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना आणखी बळ मिळाले असून विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संदेशही अधोरेखित झाला आहे.

## उरणच्या नगरसेविका नंदा म्हात्रे यांचे जात प्रमाणपत्र अवैध

### पद रद्द

**उरण : वार्ताहर**



उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेविका नंदा नामदेव म्हात्रे उर्फ नाहिदा इरफान ठाकूर यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे. त्यामुळे त्यांचे नगरसेविकापद रद्द करण्यात आले आहे.

याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश जारी केला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर संबंधित नगरसेविकेचे पद रद्द करण्याची तरतूद आहे.

नंदा म्हात्रे उर्फ नाहिदा ठाकूर या उरण नगर परिषदेच्या निवडणुकीत नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या राखीव प्रभागातून (५ अ) निवडून आल्या होत्या, मात्र त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे नगरसेवकपद जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून रिक्त झाल्याचे घोषित केले आहे. या निर्णयाची माहिती राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आली असून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## खेळाडूंच्या रोख पारितोषिकांमध्ये भरीव वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २४) मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत जनहिताचे चार निर्णय झाले. यामध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिकांच्या रकमेत भरीव वाढ करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याच्या योजनेत नॅशनल गेम्स, खेलो इंडिया तसेच दिव्यांगांच्या आणखी सहा स्पर्धांचा समावेश करण्यास तसेच रोख पारितोषिक योजनेत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठीच्या रोख पारितोषिकांत भरीव वाढ करण्यात आली असून सुवर्णपदकासाठी सात लाख (पूर्वी पाच लाख), रौप्यसाठी पाच लाख (पूर्वी तीन लाख), तर कांस्यसाठी तीन लाख (पूर्वी दीड लाख) अशी वाढ करण्यात आली आहे.

वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्ससाठी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकासाठी अनुक्रमे १० लाख, सात लाख, पाच लाख रुपये; तर नॅशनल गेम्ससाठी अनुक्रमे सात लाख, पाच लाख, तीन लाख रुपये आणि खेलो इंडियातील पदकासाठी अनुक्रमे तीन लाख, दोन लाख, एक लाख रुपये अशी तरतूद करण्यात आली आहे.

युथ ऑलिम्पिक आणि युथ पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील विजेत्यांच्या पारितोषिकांच्या रकमेत भरीव वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदकासाठी २२.५०वरून ५० लाख, रौप्यसाठी १५वरून ३० लाख, तर कांस्यपदासाठी ७.५वरून २० अशी वाढ करण्यात आली आहे. टेनिस, बॅडमिंटन आणि हॉकीसंदर्भातील स्पर्धांचाही यात समावेश करण्यात आला.

टेनिसच्या चार वेगवेगळ्या ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला तीन कोटी रुपये, तर उपविजेत्यास दोन कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. बॅडमिंटन स्पर्धेतील थॉमस कप, उबर कप, सदीरमन कप या स्पर्धांतील विजयी खेळाडूला ४० लाख, तर उपविजेत्यास २० लाख अशी तरतूद करण्यात आली आहे. हॉकी स्पर्धांत अझलन शाह कप (वरिष्ठ) आणि चॅम्पियन ट्रॉफीसाठी विजेत्यास ४० लाख, तर उपविजेत्यास २० लाख आणि सुलतान जोहर कप (कनिष्ठ) विजेत्यास २० लाख, तर उपविजेत्यास १० लाख रुपये पारितोषिक मिळणार आहे. खेळाडूंच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्याही यथोचित सन्मानाची तरतूद यात करण्यात आली.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून रुग्णांना दिलासा

## पहिल्याच करारातून ८९.६० लाखांची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.




मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना नवे जीवन मिळण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर इतरही अनेक नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे. पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# पीयूसी प्रमाणपत्र महागले!

## वाहनांच्या प्रदूषण तपासणी शुल्कात २० टक्के वाढ

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्यातील वाहनांच्या प्रदूषण तपासणी अर्थात पीयूसी प्रमाणपत्रासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे वाहनांच्या विविध प्रकारांसाठी सुधारित वार्षिक दर निश्चित केले आहेत. त्यामुळे वाहनधारकांच्या खिशावर आता PUC तपासणीसाठी अतिरिक्त भार पडणार आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या परिपत्रकानुसार, दुचाकी वाहनांसाठीचे पीयूसी शुल्क ५० रुपयांवरून ६० रुपये करण्यात आले आहे. पेट्रोलवरील तीनचाकी वाहनांसाठी १०० रुपयांऐवजी १२० रुपये, तर पेट्रोल, सीएनजी आणि एलपीजी वर चालणाऱ्या वाहनांसाठी १२५ रुपयांऐवजी १५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. डिझेलवर चालणाऱ्या वाहनांचे शुल्क १५० रुपयांवरून १८० रुपये करण्यात आले आहे.महाराष्ट्र स्टेट पीयूसी सेंटर ओनर्स असोसिएशन, ठाणे यांनी पीयूसी शुल्क वाढविण्याची मागणी केली होती. त्यानंतर परिवहन विभागाने त्रिसदस्यीय समिती स्थापन करून इतर राज्यांमधील प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राच्या दरांचा अभ्यास केला. समितीच्या अहवालानंतर शुल्कवाढीबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.

या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर ४ मे २०२६ रोजी आदेश देण्यात आला होता. याचिकाकर्त्यांचे निवेदन विचारात घेऊन आदेश प्राप्त झाल्यापासून चार महिन्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश न्यायालयाने परिवहन विभागाला दिले होते. त्यानंतर शासनाच्या पत्रव्यवहाराच्या आधारे वाहनांच्या वायुप्रदूषण तपासणीच्या दरात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्यातील सर्व पीयूसी केंद्रांना सुधारित दरांची माहिती दर्शनी भागात ठळकपणे प्रदर्शित करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच विविध प्रसिद्धी माध्यमांतून वाहनधारकांना सुधारित शुल्काची माहिती देण्यास सांगण्यात आले आहे. सुधारित दरांनुसारच शुल्क आकारावे आणि निर्धारित दरापेक्षा अधिक शुल्क आकारले जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे पीयूसी केंद्रांना देण्यात दिले आहेत.दरम्यान, प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या पीयूसी प्रमाणपत्राच्या शुल्कात झालेल्या या वाढीमुळे राज्यातील वाहनधारकांना आता पूर्वीपेक्षा १० ते ३० रुपये अधिक मोजावे लागणार आहेत.

## कर्जतमध्ये कारच्या धडकेत पाचवीतील विद्यार्थिनीचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भोईरवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत पाचवीत शिकत असलेल्या कुंडलज गावातील कु. आर्या अनिल ठोंबरे ( ११ वर्ष) हिला एका भरधाव मारुती युको कारने मागून धडक दिली. या धडकेत तिचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.



भोईरवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळा दुपारी सव्वा बारा वाजता सुटली. त्यानंतर पाचवीत शिकणारी कु. आर्या ठोंबरे आपल्या कुंडलज येथील घरी जाण्यास निघाली. कर्जत –मुरबाड रस्त्यावरील कुंडलज गावाजवळील श्री गणेश मंदिरा समोर एका भरधाव मारुती युको कारने (एम एच ४६ बी व्ही ६१५३) तिला मागून धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की आर्या गंभीर जखमी झाली. तिला त्याच युको कारच्या मालकाने कर्जत मधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती तिला मृत्य जाहीर केले.

या घटनेची माहिती मिळताच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गट शिक्षण अधिकारी उपजिल्हा रुग्णालयात आले तसेच कुंडलज गावातील ग्रामस्थ नातेवाईक मोठ्या संख्येने जमा झाले होते.

## खोपोलीत लोहाना बाजार भारतीय व्यापारी महोत्सव

### भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या शुभेच्छा



**खोपोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष रायगड जिल्हा व्यापारी आघाडीच्या वतीने तसेच खोपोली लोहाना ॲक्टिव्ह लेडीज ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोहाना बाजार भारतीय व्यापारी महोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. स्थानिक व्यापार, उद्योग आणि महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी या भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाला भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी विशेष भेट देऊन संपूर्ण महोत्सवाची पाहणी केली आणि आयोजकांसह सर्व सहभागींचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

महोत्सवात एकूण ८० महिला उद्योजिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या विविध उत्पादनांचे व वस्तूंचे प्रदर्शन मांडले होते. कार्यक्रमादरम्यान या सर्व यशस्वी महिला उद्योजिकांना अधिकृत प्रमाणपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे संयोजक संजय जगदीश तन्ना यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

या प्रसंगी रायगड जिल्हा चिटणीस दीपक बेहेरे, खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष राजेश भगत, किसान मोर्चा राज्य सरचिटणीस सुनील गोगटे, मनीष खवले, खोपोली मंडळ अध्यक्ष अजय इंगूलकर, नगरसेविका अश्विनी अत्रे, मितेश शाह, गुजराती लोहाना समाज अध्यक्ष शैलेश विठलानी, जैन समाज अध्यक्ष सुभाष पोरवाल, मालकीत सिंह विहाल, बूझ हास्य क्लब अध्यक्ष बाबूभाई ओसवाल तसेच खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्यासह अनेक नागरिक, व व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोक सेवा पुरस्काराने डॉ. राजू पाटोदकर सन्मानित



**पुणे : प्रतिनिधी**

पुणे येथील लोकप्रिय हिंदी दैनिक भारत डायरीच्या 28व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे–पाटील यांच्या हस्ते लोक सेवा पुरस्काराने माजी उपसंचालक डॉ. राजू पाटोदकर यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, पुणे येथे करण्यात आले होते. त्या वेळी स्त्री शक्ती, वैद्यकीय सेवा, पत्रकारिता, समाजकार्य अशा विविध क्षेत्रातील १३ मान्यवरांचाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

भारत डायरीचे संपादक लवकुश तिवारी, आधारस्तंभ विनोद बंसल, प्रबंध संपादक संजय गायकवाड, अहिल्यानगर प्रतिनिधी व वरिष्ठ पत्रकार महेश देशपांडे महाराज, भाजप प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर, नगरसेविका मंजूश्री खर्डेकर, आरएसएस प्रचार मंडल सदस्य प्रकाश देशपांडे, प्रसिद्ध समाजसेवी उद्योगपति पवन सराफ, शिक्षण क्षेत्रात कार्यरत अशोक मिस्त्री, प्रसिद्ध ट्री मैन डॉ रमेश बंसल, सामाजिक कार्यकर्ता भीमराव पाटोळे, बाळासाहेब घोडके, स्व. अशोक अग्रवालजी यांच्या धर्मपत्नी प्रेमलता अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ता नीता अग्रवाल, सरस्वती जयकिशन गोयल, बिंदु तिवारी, प्रसिद्ध लेखक रणजीत सिंह अरोरा अर्श, जलसंपदा विभाग पुणे चे कार्यकारी अभियंता किरण देशमुख आदी यावेळी उपस्थित होते. याबद्दल पाटोदकर यांचे अभिनंदन होत आहे.

## महाड येथील अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठेला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने आयोजित ‘अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठ’ उपक्रमाला महाड येथे ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री वीरेश्वर मंदिर सभागृह, महाड येथे दि. २१ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या बाजारपेठेत रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील नवउद्योजकांनी सहभाग घेत आपल्या उत्पादनांचे थेट ग्राहकांपर्यंत सादरीकरण व विक्री केली.

‘अमृतपेठ’चे उद्घाटन विश्व हिंदू परिषदेचे शरददादा गांगल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक शिवराजजी भागवत, महाड नगरपरिषदेचे नगरसेवक ॲड.सनी जाधव, सौ. विद्याताई देसाई, मणिरी वेस्ट मॅनेजमेंटच्या संस्थापक सौ ममता मेहता तसेच मणिरीच्या स्वयंसेविका दीप शेट, कांचन महाडीक, गायत्री बोरगावकर,मृणाल शेट, रोशनजी भुवड, विशानेमा गुजराती महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रियंका गुजर आणि प्रभात कॉलनी महिला मंडळाच्या अध्यक्षा जयश्री मेहता यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

एक दिवस राष्ट्रासाठी’ या उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरासाठी जनकल्याण रक्त केंद्राने विशेष सहकार्य केले. अमृतपेठमधील उद्योजिका तसेच बाजारपेठेला भेट देणाऱ्या ग्राहकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. व्यवसायासोबतच समाजासाठी योगदान देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या बाजारपेठेत घरगुती पिठे, हस्तकलेच्या वस्तू, इमिटेशन ज्वेलरी, विणकामाच्या वस्तू, घरगुती मसाले, आयुर्वेदिक उत्पादने, सोलर प्रणालीवर चालणारी उपकरणे, महिलांनी हाताने तयार केलेल्या आकर्षक पर्स यांसह विविध प्रकारची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होती. स्थानिक उद्योजकांनी तयार केलेल्या दर्जेदार व नाविन्यपूर्ण उत्पादनांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळाली.

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘अमृत’मार्फत महिलासक्षमीकरण, लघुउद्योगांना चालना आणि स्वयंरोजगार निर्मितीवर भर देण्यात येत आहे. स्थानिक लघुउद्योजक तसेच लक्षित गटातील विविध व्यवसायांचे प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांच्या विक्री कौशल्याला चालना मिळावी आणि ग्राहकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळावी, या उद्देशाने व्यवस्थापकीय संचालक (अमृत) यांच्या संकल्पनेतून ‘अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठ’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.‘अमृतपेठ’ यशस्वी करण्यासाठी अमृतचे जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे, उपव्यवस्थापक मंगेश ढेबे, अमृतसखी जान्हवी साठे तसेच स्थानिक अमृत मित्र विक्रांत बुटाला आणि केदार पुरोहित यांनी अथक परिश्रम घेतले.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवार (दि.२३) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ३,१९,५००/– रुपये इतका दंड आकारला आहे.

पान १ वरुन

## राजिप कृषी विभागाकडून प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान

यासाठी केंद्र व राज्य शासनाचेही सहकार्य आपल्याला लाभत आहे. शेतीला पूरक असणाऱ्या व्यवसायांसाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. येत्या काळात १२ ते १५ हजार शेतकऱ्यांना मिनी भाजीपाला किट देण्यात येणार आहे. पशुसंवर्धन विभागानेही पशुधन विमा योजना सुरू केली आहे. त्यामुळे या सर्व योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकार डॉ. रूपाली सातपुते यांनी रायगडातील शेतकरी प्रयोगशील असल्याने आता विविध पिके वाढत आहेत. शेतीमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. रायगडातील पारंपरिक तांदूळ, आंबा पिकासह भाजीपालाख् कलिंगडासारखे पिकेही शेतकरी घेत आहेत. त्यामुळे इतर शेतकऱ्यांनीही आपल्या शेतामध्ये विविध प्रयोग करावेत तसेच जिल्हा परिषदेच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी एकूण ३६ पुरस्कार प्राप्त आणि १४ प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये उद्यान पंडित पुरस्कार, शेतीनिष्ठ पुरस्कार, सेंद्रीय शेती कृषिभूषण पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कारांचे वितरण करून शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले. शेवटी मोहीम अधिकारी महेश नारायणकर यांनी नव्याने सुरू झालेल्या एफएफएस ॲप प्रणालीबाबत मार्गदर्शन केले.

# खेळ खेळूया मंगळागौरीचा...

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून नवी मुंबईत स्त्री–शक्तीचा भव्य जागर; महिलांचा उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी संस्कृती जपण्यासोबतच महिला भगिनींना हक्काचे आनंददायी व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने, 'श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या' वतीने आणि बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून तसेच भाजप नेते निलेश म्हात्रे यांच्या पुढाकारातून 'खेळ खेळूया मंगळागौरीचा' हा पारंपरिक कार्यक्रम अत्यंत उत्साहात, जल्लोषात आणि आनंदमयी वातावरणात पार पडला. वाशी येथील ऐतिहासिक विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित या सोहळ्यास नवी मुंबईतील महिला भगिनींनी या सोहळ्यास उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद दिला.



या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शहरातील विविध भागांतून आलेल्या १३ महिला संघांनी (ग्रुप्स) यामध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता. सहभागी संघांनी झिम्मा, फुगडी, पिंगा, काचगुण्या, उखाणे आणि मंगळागौरीच्या विविध पारंपरिक खेळांचे बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकून घेतली.

या कार्यक्रमात पारंपरिक वेशभूषेत नटलेल्या महिला भगिनींच्या नाकात नथ आणि अंगावर पैठणी हा खास साज सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरला. स्पर्धेत अप्रतिम सादरीकरण करणाऱ्या संघांना प्रोत्साहन देण्यासाठी भरघोस बक्षिसांचे वाटप करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या संघांना

प्रथम क्रमांक रोख ₹५,००१/– ,चे ५ पारितोषिके द्वितीय क्रमांक रोख ₹३,००१/–, चे ३ पारितोषिके तृतीय क्रमांक रोख ₹२,००१/– चे २ पारितोषिके आणि उत्तेजनार्थ रोख ₹१,००१/– अनेक अशी रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यासोबतच विजेत्यांना पैठणी आणि नथ ही विशेष बक्षिसे देण्यात आली, तसेच कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्व महिला भगिनींना संस्थेच्या वतीने विशेष भेटवस्तू देऊन त्यांचा यथोचित सन्मान व गौरव करण्यात आला.

या भव्य सोहळ्यास आयोजक आमदार मंदा म्हात्रे आणि भाजपा नेते निलेश म्हात्रे यांच्यासमवेत भावना ग्रुपच्या अपर्णा शहा, उषा दत्त, मा. नगरसेवक राजू शिंदे, माजी नगरसेविका माधवी शिंदे, पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता म्हात्रे यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे परीक्षण आणि विशेष आकर्षण लावणी सम्राट आशिमिक कामठे यांची उपस्थिती देखील लाभली. त्याचप्रमाणे शहरातील विविध मंडळांचे पदाधिकारी, शेकडो महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुखवटा

### जयश्री वाघमारे



**रोहा :** अष्टमी येथील कोळी समाजाचे विनोद वाघमारे यांची पत्नी जयश्री वाघमारे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे.त्यांच्या अंत्ययात्रेस अष्टमी, रोहा शहरासह विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पती विनोद वाघमारे सह मुली,तीन भाऊ, भाचे, जावई, नातवंडे, वाघमारे असा परीवार आहे.त्यांची दशक्रीया विधी 28 ऑगस्ट रोजी रस्त्या घरी होणार आहे तर तेरावे 30 ऑगस्ट रोजी त्यांच्या राहते घरी होणार आहे.

### शशिकांत कोशे



**उरण :** लोहार समाजाचे सल्लागार शशिकांत शंकर कोशे यांचे रविवार ( दि. १६ ) रोजी दु;खद निधन झाले .मृत्यू समयी त्यांचे वय ६६ वर्षे होते .त्यांच्या पश्चात पत्नी ,मुलगा सुमित ,मुलगी स्वाती , नात ,नातू असा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि.२५ ) रोजी क्षेत्र माणकेश्वर ( केगाव ) येथे सकाळी ८ वाजता होणार आहे . दिवस कार्य गुरुवार (दि. २७ ) रोजी रिद्धी –सिद्धी अपार्टमेंट , कुंभार वाडा उरण येथे सकाळी १० वाजता होणार आहे.

# नावडे, तळोजा फेज २मध्ये अतिक्रमणांवर हातोडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उपविभाग नावडे, तळोजा फेज-२ परिसरात वारंवार प्राप्त होत असलेल्या अतिक्रमणाच्या तक्रारींची दखल घेत पनवेल पालिकेच्या वतीने सोमवारी (दि.२४) अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

महापालिकेच्या पथकाने कारवाई करताना पाच हातगाड्या, आठ काटे तसेच रस्त्यावरील अन्य अतिक्रमित साहित्य जप्त केले. अतिक्रमणे हटविल्यामुळे फुटपाथ पादचाऱ्यांसाठी मोकळा झाला असून नागरिकांना सुरक्षितपणे ये-जा करता येणार आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.





नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे, पादचाऱ्यांसाठी फुटपाथ उपलब्ध करून देणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत ही कारवाई करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे अतिक्रमण करून वाहतुकीस तसेच पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात यापुढेही नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

# गांजाविक्री प्रकरणी पनवेल पोलिसांची धडक कारवाई

## ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करत गांजासह सुमारे ९० हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी आरोपी अभिमान अबू गुंजाळ (१९) याची चौकशी केली.

चौकशीत त्याने गांजा राहुल हारकळ याच्याकडून घेतल्याचे सांगितल्याचे पोलिसांच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे पुणे येथील संबंधित ठिकाणी तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी समीम मुत्तलीब शेख याच्याशी संबंधित ठिकाणाची माहिती पोलिसांना मिळाली. संबंधित घर बंद असल्याचे आढळून आले, मात्र घरामध्ये गांजा हा अमली पदार्थ असल्याचा संशय असल्याने स्थानिक पोलिसांच्या उपस्थितीत व पंचांच्या साक्षीने घरझडती घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात आली. घरझडतीदरम्यान पोलिसांना सुमारे ६० हजार रुपये किमतीचा गांजा आढळून आला.

गांजा विक्रीसाठी वापरले जाणारे साहित्यही पोलिसांच्या हाती लागले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत ९० हजार ९९० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले. प्राथमिक तपासानुसार गांजा विक्रीच्या उद्देशाने बाळगण्यात आल्याचा संशय आहे.

# ६६ लाखांचे सोने घेऊन नोकर फरार; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

सोन्याच्या शुद्धतेची तपासणी करण्यासाठी मालकाने दिलेल्या सहा सोन्याच्या लगडी घेऊन नोकर फरार झाल्याची घटना पनवेलमध्ये उघडकीस आली आहे. या सोन्याचे वजन ६६६.२३ ग्रॅम असून त्याची एकूण किंमत ६६ लाख ६२ हजार ३०० रुपये आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार रोशन कोळेकर (२४) यांचा झवेरी बाजारात सोन्याचे दागिने शुद्ध करण्याचा व्यवसाय आहे. संबंधित तरुण गेल्या आठ महिन्यांपासून त्यांच्या दुकानात काम करीत होता. कोळेकर यांनी सोन्याच्या शुद्धतेची तपासणी करून आणण्यासाठी त्याच्याकडे सहा सोन्याच्या लगडी दिल्या. या लगडी घेऊन तो जोशी आळी येथील मिडास हॉलमार्क सेंटरकडे गेला. मात्र, बराच वेळ उलटूनही तो दुकानात परतला नाही.

संशय आल्याने कोळेकर यांनी त्याच्याशी मोबाइलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा मोबाइल बंद असल्याचे आढळून आले. त्यानंतर त्याचा परिसरात शोध घेण्यात आला; परंतु त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर कोळेकर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# गव्हाण विद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची सभा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शनिवारी (दि. २२) महिला तक्रार निवारण समितीची दुसरी सहविचार सभा उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाली. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह आरोग्य, स्वच्छता, शिस्त आणि किशोरवयीन मुलींच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महिला तक्रार निवारण समितीच्या विभागप्रमुख प्रतिज्ञा घरत यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी विद्यार्थिनींच्या स्वच्छतागृहांचा योग्य वापर, विद्यार्थिनींच्या शिस्तीचे पालन,



गणवेश, किशोरवयीन मुलींसाठी आवश्यक मार्गदर्शन, तक्रार पेटीचा प्रभावी वापर तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसंदर्भातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी विद्यार्थिनींच्या मासिक पाळीच्या काळातील आरोग्यविषयक गरजा, त्या काळात महिला शिक्षकांनी घ्यावयाची काळजी, विद्यार्थिनींना योग्य मार्गदर्शन करण्याच्या पद्धती तसेच माता-पालकांना या विषयाबाबत संवेदनशीलतेने मार्गदर्शन करण्याची आवश्यकता याविषयी सविस्तर चर्चा केली.

किशोरवयीन मुलींमध्ये शारीरिक व मानसिक बदल होत असताना त्यांना योग्य माहिती, समुपदेशन आणि विश्वासाचे वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सभेला विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या वर्गातील विद्यार्थिनींच्या समस्या, अडचणी तसेच त्यांच्या निदर्शनास आलेल्या विविध तक्रारींबाबत समितीसमोर मते मांडली. विद्यार्थिनींना कोणतीही अडचण असल्यास ती न घाबरता संबंधित शिक्षक अथवा समितीच्या सदस्यांसमोर मांडता यावी यासाठी विश्वासपूर्ण व सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

विद्यार्थिनींच्या आरोग्याशी, सुरक्षिततेशी, शिस्तीशी किंवा वैयक्तिक अडचणींशी संबंधित प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर योग्य, संवेदनशील आणि सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी दिली. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालय प्रशासन, महिला तक्रार निवारण समिती, महिला शिक्षिका, माता-पालक आणि समाजातील महिला घटक यांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहनही करण्यात आले.

गव्हाण विद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपाध्यक्षपदी पर्यवेक्षिका शशिकला पाटील, तर स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी म्हणून रत्नप्रभाताई घरत कार्यरत आहेत. समितीमध्ये गावातील महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका तसेच विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका भगिनींचा समावेश आहे. विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक, किशोरवयीन तसेच दैनंदिन जीवनातील अडचणी समजून घेऊन त्यांचे योग्य निराकरण करणे, त्यांना सुरक्षित व आनंददायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हक्कांचे व सुरक्षिततेचे संरक्षण करणे या उद्देशाने समितीच्या माध्यमातून सातत्याने कार्य करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# कॅम्पस कनेक्ट उपक्रमातून व्यसनमुक्तीचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेल यांनी कॅम्पस कनेक्ट उपक्रमांतर्गत नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शनिवारी (दि. २२) महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केले होते. कार्यक्रमाचे प्रत्यक्ष आयोजन डी. वाय. पाटील महाविद्यालय परिसर, नेरूळ येथे करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या डी.एल.एल.ई. समितीच्या वतीने प्राचार्य डॉ. सनावी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक प्राध्यापक अनम मेहंदिकर यांच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दरम्यान, सदर कार्यक्रमासाठी खांदेश्वर पोलीस प्राधिकरणाच्या पोलीस अधिकारी श्वेता पाटील यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.३० वाजता झाली आणि दुपारी ३.०० वाजता कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांमध्ये



अमली पदार्थ व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, व्यसनांपासून बचाव, अमली पदार्थांशी संबंधित कायदेशीर परिणाम तसेच निरोगी, जबाबदार आणि नशामुक्त जीवनशैलीबाबत जनजागृती करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमामध्ये गीते, संदेशपर प्रात्यक्षिके, नाटिका, पथनाट्य, पोस्टर निर्मिती आणि रील निर्मिती अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी प्रभावी संदेश दिला. या सादरीकरणांमधून अमली पदार्थांच्या सेवनाचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर परिणाम अधोरेखित करण्यात आले. पथनाट्य, पोस्टर आणि रील स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करून त्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नशामुक्ती अभियानावरील संदेशाचे थेट प्रक्षेपण.

विद्यार्थ्यांनी या अभियानात सहभाग घेत "अमली पदार्थांना नाही म्हणूया" अशी शपथ घेतली. तसेच खांदेश्वर पोलीस प्राधिकरणाच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे धोके, व्यसनापासून बचावाचे उपाय आणि अमली पदार्थांशी संबंधित कायदेशीर परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. डी. वाय. पाटील महाविद्यालय परिसर, नेरूळ येथे आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाशी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून जोडण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना नशामुक्ती अभियानाचा संदेश समजून घेण्याची आणि त्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळाली.

दरम्यान, कार्यक्रमाचा समारोप "अमली पदार्थांना नकार द्या, आरोग्य आणि उज्ज्वल भविष्याची निवड करा" या प्रभावी संदेशाने झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्ती, सामाजिक जबाबदारी, कायदेशीर जाणीव आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. महाविद्यालयाच्या "जबाबदार नागरिक घडविणे आणि न्यायाचा प्रसार करणे" या उद्दिष्टाला अनुसरून हा जनजागृतीपर उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# पनवेलमध्ये वाहनचालकांसाठी आरोग्य शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था आणि जिल्हा एड्स नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २३) श्री गणेश साई मंदिर, साईनगर रोड, पनवेल येथे स्कूल बस, व्हॅन चालक, त्यांचे सहकारी तसेच इतर वाहनचालकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला वाहनचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल १५० वाहनचालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरज पवार आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुरतकर यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात वाहनचालकांची रक्तदाब, रक्तातील साखर, हृदयाच्या विद्युत आलेखाची तपासणी, कावीळ प्रकार बी व सी, एचआयव्ही यासह विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तसेच वाहनचालकांची नेत्र तपासणीही करण्यात आली. वाहनचालकांचे आरोग्य निरोगी असणे त्यांच्या स्वतःच्या तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.



शिबिरासाठी महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्टच्या वतीने कार्यक्रम व्यवस्थापक आनंद पाटील, सुशील पाटील, कशेळे येथील एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्राच्या समुपदेशक आशा बाळशंकर आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ स्नेहल दुधसागर यांनी सहकार्य केले.तसेच अपोलो रुग्णालयाच्या वतीने गौरी समीर फडके यांनी आरोग्य तपासणीसाठी सहकार्य केले. नेत्र तपासणीसाठी अरुण कदम व अंजली जाधव यांनी योगदान दिले. हृदयाच्या विद्युत आलेखाच्या तपासणीसाठी सुविधा शेडगे तसेच पनवेल महानगरपालिकेच्या नयना अनिल महाले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

आरोग्य शिबिराला पालिकेचे नगरसेवक लतीफभाई शेख, नगरसेविका आर्या जाधव, मनोहर सचदेव व अमोल साखरे यांनी सदिच्छा भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे, सचिव बन्सीलाल तळेकर, खजिनदार किसन रौंधळ, कार्याध्यक्ष राजेश भगत, सहसचिव अशोक पोकळे, सहसचिव शरद घुले तसेच संस्थेच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले. वाहनचालकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच आजारांचे वेळेत निदान व्हावे यासाठी अशा प्रकारची आरोग्य तपासणी शिबिरे नियमितपणे आयोजित करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# डेरवली शाळेच्या विद्यार्थ्यांचा आर्मी स्कूलमध्ये रक्षाबंधन सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

आनंददायी शनिवार या शैक्षणिक उपक्रमांतर्गत पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद डेरवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन व वृक्षाबंधन हा उपक्रम उत्साहात साजरा करत आर्मी शाळेतील विद्यार्थ्यांना बंधुभाव, देशप्रेम आणि निसर्गप्रेमाचा संदेश दिला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केल्यानुसार २१ व्या शतकातील कौशल्ये, व्यवहारिक कौशल्ये व चांगल्या सवयींचे संपादन करून सुजाण व उत्पादक नागरिक घडविण्यासाठी शालेय शिक्षणात 'आनंददायी शनिवार' या उपक्रमाची आखणी करण्यात आली आहे.

याच उद्देशाने आयोजित आनंददायी शनिवारच्या उपक्रमांतर्गत डेरवली शाळेत हा



कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या पनवेल तालुक्यातील विजय आर्मी स्कूल, चिखले येथील विद्यार्थ्यांना बांधून रक्षाबंधनाचा आनंद साजरा केला. या भेटीदरम्यान दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांनी एकमेकांशी सुसंवाद साधत मैत्री, बंधुभाव व राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या या भेटीतून देशप्रेमाची भावना जागृत होण्यास मदत झाली.

# सी.पी. प्रजापती यांना मानद डॉक्टरेट पदवी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



समाजसेवा, जनसेवा तसेच सर्जनशील क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल समाजसेवक चंद्र प्रताप प्रजापती (सी. पी.) यांना मानद डॉक्टरेट या प्रतिष्ठित पदवीने सन्मानित करण्यात आले. चित्रपट निर्मिती व दिग्दर्शनातील सहकार्य तसेच सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य आणि सातत्यपूर्ण सामाजिक योगदान यासाठी त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

सन्मानानंतर डॉ. प्रजापती यांनी सांगितले की, हा सन्मान कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना, मित्रांना, समाजातील सर्व सन्माननीय बंधू-भगिनींना तसेच हितचिंतकांना समर्पित करतो. त्यांनी माझे मनोबल वाढवून सामाजिक व सर्जनशील कार्याला पाठिंबा दिला.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगीसंदर्भात पनवेल महापालिकेची आज संयुक्त बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच उत्सव सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी संबंधित शासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग, अग्निशमन विभाग, महावितरण तसेच इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मंगळवारी (दि. २५) सायंकाळी ५ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक गणोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मंडप, स्टेज, कमानी आदी



उभारण्यासाठी आवश्यक परवानग्या तसेच त्यासंबंधी पूर्वनियोजनाच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने तयारी करण्यात आली आहे. यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'एक खिडकी योजना' कार्यान्वित केली आहे. मंडळांना ऑनलाइन पद्धतीने परवानगी मिळण्यासाठी http://pandal.maharts.in या स्वतंत्र संकेतस्थळाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सार्वजनिक उत्सवांसाठी उभारण्यात येणारे मंडप, स्टेज, कमानी आदींबाबत महानगरपालिकेने सविस्तर कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे. त्यानुसार मार्गदर्शक सूचना देण्यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२६' साजरा करणाऱ्या सर्व गणेशोत्सव मंडळे, संस्थांच्या प्रतिनिधींनी बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

बैठकीस महानगरपालिका सदस्य, अधिकारी-कर्मचारी, पनवेल तहसीलदार, पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग, महावितरण, अग्निशमन विभाग व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. गणेशोत्सवात नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये व उत्सव शांततेत, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी महानगरपालिकेकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

## संपादकीय

# योग्य प्रशिक्षण हवे

शैक्षणिक सुधारणांची चर्चा सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या चर्चेत अभ्यासक्रम, परीक्षा, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा यांच्या सोबतच प्राथमिक स्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण आणि त्यांची मुलांकडे पाहण्याची दृष्टी यांनाही अग्रक्रमाने स्थान मिळायला हवे.

**गृहपाठ पूर्ण न केल्याच्या कारणावरून विशाखापट्टणममध्ये एका सहा वर्षांच्या चिमुरड्याला शिक्षिकेने मारहाण केली आणि त्यानंतर त्याचा संशयास्पदरित्या मृत्यू झाला. वर्गातील सीसीटीव्हीमध्ये शिक्षिका मुलाला रागावताना, त्याचा गणवेश खेचताना आणि त्याला कानाखाली मारताना दिसते. पाठोपाठच मुलगा तिच्या अंगावर कोसळतो. उपलब्ध माहितीनुसार या चिमुकल्याला लगेच रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेतील अवघ्या सहा वर्षांच्या प्रणय तेज याच्या मृत्यूचे नेमके वैद्यकीय कारण तपासातून स्पष्ट होणे बाकी असले तरी त्याला झालेल्या मारहाणीचा प्रकार आक्षेपार्हच म्हटला पाहिजे. कुणाही सुजाण नागरिकासाठी ही घटना मन सुन्न करणारी आहे. शाळांमध्ये मुलांना मारहाण किंवा अपमानित करण्याच्या घटना अधूनमधून समोर येत असतात. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या अभावामुळे किंवा मुलांच्या भीतीमुळे प्रत्येक घटना उघडकीस येतेच असे नाही. त्यामुळेच या घटनेकडे अपवादात्मक म्हणून न पाहता उलट या घटनेच्या निमित्ताने पडद्यामागे घडणाऱ्या अशा प्रकारांकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या घटनेतील आणखी धक्कादायक भाग म्हणजे मुलाला अपमानित करण्यासाठी त्याचे कपडे काढण्याचा प्रयत्न झाल्याचेही सीसीटीव्ही चित्रणातून दिसते. सहा वर्षांच्या मुलाने गृहपाठ न केल्यास त्यासाठी त्याला भर वर्गात भीती, वेदना आणि अपमान सहन करावा लागावा ही कल्पनाच अस्वस्थ करणारी नाही का? इतक्या लहान मुलाला शिक्षणाच्या व शिस्तीच्या नावाखाली अशी कठोर शिक्षा देणे ही कुठली विचारसरणी? गृहपाठ हा शिक्षणाचा एक भाग आहे. पण तो मुलाच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचवण्याइतका मोठा नक्कीच असू शकत नाही. शाळेत शिस्त निश्चितच आवश्यक आहे. विशेषतः लहानग्यांच्या वर्गात त्यांना शिस्तीने बसवणे, लक्ष द्यायला शिकवणे, वर्गातील उपक्रमात सहभागी करून घेणे हे शिक्षकांसाठी आव्हानात्मक असते. पण शिस्त म्हणजे शिक्षा नव्हे आणि शिक्षा म्हणजे मारहाण तर मुळीच नव्हे. सहा–सात वर्षांच्या मुलांकडून अपेक्षा ठेवताना त्यांच्या वयाचा, भावनिक विकासाचा आणि शिकण्याच्या क्षमतेचा विचार करावा लागतो. वर्ग सांभाळण्यासाठी, मुलांचे लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि अडचणीच्या वर्तनाला सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिक्षक विषय चांगला शिकवतो एवढे पुरेसे नाही. विशेषतः पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक स्तरावर मुलांशी कसे वागायचे हेही प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना शिकवले पाहिजे. प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांच्या प्रशिक्षणात सकारात्मक शिस्त, वर्गव्यवस्थापन, आणि मुलांच्या भावनिक गरजा यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळाला कायद्यात स्पष्ट मनाई आहे. सर्वोच्च न्यायालयानेही शिक्षणाची गुणवत्ता, प्रशिक्षित शिक्षक आणि शारीरिक शिक्षा व मानसिक छळाला प्रतिबंध यांना महत्त्वाचे शैक्षणिक निकष मानले आहे. तरीही हा संदेश अद्याप प्रत्येक शिक्षकापर्यंत पोहोचलेला दिसत नाही. विशाखापट्टणमची घटना केवळ एका शिक्षिकेच्या कथित गैरवर्तनाची चौकशी करून संपता कामा नये. आपल्या शिक्षणव्यवस्थेला आत्मपरीक्षणाची गरज आहे. मुलाला घडवण्याचा अधिकार शिक्षकाला मिळतो. शिस्तीच्या नावाखाली भीती निर्माण करणारे शिक्षक नव्हे तर विश्वास निर्माण करणारे शिक्षक हीच प्राथमिक शिक्षणाची खरी गरज आहे.**

# वाघ केवळ शिकारी नव्हे, तर जैवशृंखलेचा श्वास!

वाघ केवळ शिकारी नव्हे, तर जैवशृंखलेचा श्वास आहे. भारतीय संस्कृतीत वाघ हे केवळ वन्य प्राणी नाही, तर सामर्थ्य, शौर्य आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक मानले गेले आहे. देवी दुर्गेच्या वाहनापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफांवरील कोरीव वाघापर्यंत याचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याच वाघाच्या संवर्धनासाठी दरवर्षी जागतिक व्याघ्र दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ प्राण्यांसाठी नाही, तर आपल्याच संवेदना जागवणारा आहे.वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च शिकारी असला, तरी त्याचे अस्तित्व म्हणजे संपूर्ण जैवविविधतेचे आरोग्य आहे.



एक वाघ सुमारे ५० ते १०० चौ. किमी परिसर व्यापतो आणि त्या अधिवासातील अनेक प्रजाती, झाडे, जलस्रोत यांचे संरक्षणही नकळत घडते. म्हणूनच म्हटले जाते, वाघ वाचला, तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले, तर माणसाचे आयुष्यही सुरक्षित राहील. एकेकाळी भारतात ४० हजार वाघ होते, परंतु अविचारी शिकारी व जंगलतोडीमुळे १९७२ पर्यंत केवळ १,४०० इतकी संख्या उरली. या घटलेल्या संख्येच्या पार्श्वभूमीवर 'प्रोजेक्ट टायगर' ही ऐतिहासिक मोहीम सुरू झाली आणि आज भारतात पुन्हा ३,१६७ वाघ अस्तित्वात आहेत, जे जगातील सर्वाधिक आहेत.महाराष्ट्रातील वाघ संवर्धनात जळगाव जिल्ह्याचाही वाटा वाढतो आहे. विशेषतः यावल प्रादेशिक वनविभागात २०११ नंतर पुन्हा वाघ दाखल झाला. मेळघाटातून वाघ वाघदऱ्या, वढोदा रेंजमार्गे स्थलांतर करून यावलच्या जंगलात येतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. २०२४ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे वाघाचे दृश्य नोंदवले गेले. २०२५ मध्ये गौताळा–ऑट्रामघाट परिसरातही अशाच प्रकारच्या वाघाच्या उपस्थितीच्या बातम्या मिळाल्या. यावल विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या माहितीनुसार सध्या यावल परिसरात दोन वाघ ट्रान्झिट अवस्थेत आहेत, तर मुक्ताईनगर भागात 'बनाना टायगर' म्हणून ओळखला जाणारा वाघ अधूनमधून दिसून येतो. पाल जंगल सफारी मार्गावर वाघाच्या पावलांचे ठसेही अलीकडेच आढळले आहेत आणि जंगल सफारी लवकरच सुरू होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर यावल प्रादेशिक वनविभागात १२ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात पार पडलेली वन्यप्राणी गणना ही वेगळाच अनुभव देणारी ठरली. चोपडा, वैजापूर, अडावद, देवझिरी, यावल (पूर्व–पश्चिम) आणि रावेर अशा सातही वनक्षेत्रात एकूण ३९ मचानींवर प्राणीगणना झाली. ८० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला आणि एकूण ५८४ वन्य प्राण्यांची नोंद झाली. यामध्ये निलगाय, चिंकारा, भेकर, सांबर, चौशिंगा, काळवीट यांसारखे शाकाहारी, तसेच बिबट, लांडगा, कोल्हा, रानमांजर, तरस, अस्वल यांसारखे शिकारी प्राणी दिसून आले. विशेष म्हणजे रावेर वनक्षेत्रात एक वाघ आणि चार बिबटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. हे सर्व प्राणी वाघाच्या नैसर्गिक अधिवासात सहअस्तित्व करणारे आहेत, म्हणूनच ही प्रजाती साखळी वाघाच्या अस्तित्वाला पूरक ठरते.वाघाचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. जेथे वाघ आहे, तेथे मानवी हस्तक्षेप कमी असतो, त्यामुळे नैसर्गिक जलस्रोत जिवंत राहतात.

याच पाण्यावर शेती आणि मानवी वस्त्या अवलंबून असतात. त्यामुळे वाघ वाचविणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शेतकरी आणि सामान्य माणसाचे जीवन सुरक्षित करणे आहे. आज वाघासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे अधिवासाचे तुकडे होणे. महामार्ग, रेल्वे मार्ग आणि मानवी अतिक्रमणामुळे त्याच्या नैसर्गिक कॉरिडॉरला अडथळा निर्माण होतो आहे. अशा वेळी यावलसारख्या उपवनात वाघाचे पुनरागमन ही आशादायी बाब आहे.या संपूर्ण उपक्रमाचे यश हे केवळ वनविभागाचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे आहे. जिल्हा प्रशासनाचे सहकार्य, निसर्गप्रेमींचा उत्साह आणि निनू सोमराज (वनसंरक्षक), जमीर शेख (उपवनसंरक्षक), समाधान पाटील (सहायक वनसंरक्षक), तसेच प्रशासन व मैदानातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने हे शक्य झाले.यावल, रावेर आणि चोपडा तालुक्यांतील जंगल हे सातपुडा पर्वत रांगेचा भाग असून ते मध्य प्रदेशातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाशी जोडलेले आहे.

त्यामुळे या भागाला कॉरिडॉर म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. या कॉरिडॉरच्या संरक्षणासाठी लोकसहभाग वाढविणे गरजेचे आहे. शाळा–महाविद्यालयांमध्ये व्याघ्र संवर्धनावर व्याख्याने, निसर्ग मंडळांची स्थापना आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविल्यास युवा पिढीमध्ये वाघाविषयी आत्मीयता निर्माण होईल.पाल येथे प्रस्तावित जंगल सफारी सुरू झाल्यास स्थानिक युवकांना रोजगाराची संधी मिळेल, पर्यटन वाढेल आणि वनसंवर्धनाला बळ मिळेल. जबाबदार पर्यटन हा संवर्धनाचा महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकमुक्त जंगल, शांतता पाळणे आणि वन्य प्राण्यांपासून सुरक्षित अंतर ठेवणे हे नियम पाळले, तर मानव–वन्यजीव संघर्ष टाळता येईल. वाघ हा आपल्या निसर्गाचा अभिमान असून त्याचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वाघ वाचवणे म्हणजे केवळ एक प्रजाती वाचवणे नव्हे, तर हवामान, पाणी, माती, जंगल आणि पर्यायाने आपलेच भविष्य सुरक्षित ठेवणे होय.

वाघाच्या अस्तित्वामुळे जंगलातील जैवसाखळी संतुलित राहते. वाघामुळे तृणभक्षी प्राण्यांची संख्या नियंत्रणात राहते, त्यामुळे जंगलातील गवत आणि झाडांची वाढ नैसर्गिक राहते. हे जंगलच पुढे पावसाचे प्रमाण टिकवून ठेवण्यास आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यास मदत करते. त्यामुळे वाघ हा केवळ वन्यजीव नसून जल, जंगल, जमीन यांचा रक्षक आहे.यावल प्रादेशिक वनविभागाने गेल्या काही वर्षांत वन्यजीव संरक्षणासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. ट्रॅप कॅमेऱ्यांची संख्या वाढविणे, पाणवठ्यांची निर्मिती, गस्त वाढविणे आणि स्थानिक ग्रामस्थांना वनसंरक्षणात सहभागी करून घेणे यावर भर दिला जात आहे. सातपुडा पर्वत रांगेतील हा विभाग मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला जोडणारा महत्त्वाचा कॉरिडॉर असल्याने येथे वाघाचा वावर हा संपूर्ण महाराष्ट्राच्या संवर्धन प्रयत्नांसाठी आशादायी संकेत आहे.

वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, यावल आणि रावेर परिसरात वाघासाठी आवश्यक असलेले भक्ष्य, पाणी आणि शांतता या तिन्ही गोष्टी उपलब्ध आहेत. त्यामुळे येथे स्थायी वास्तव्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, यासाठी मानवी हस्तक्षेप कमी करणे आणि कॉरिडॉर अतिक्रमणमुक्त ठेवणे आवश्यक आहे. महामार्गावरील वेगमर्यादा, रात्रीच्या वेळी जंगल मार्गावर वाहतुकीवर नियंत्रण आणि बेसुमार वृक्षतोड थांबविणे या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे.पाल येथे प्रस्तावित जंगल सफारीमुळे स्थानिकांना रोजगार मिळण्यासोबतच वनसंवर्धनाबाबत जागरूकता वाढणार आहे.

पर्यटकांनी जबाबदार पर्यटनाचे नियम पाळल्यास मानव–वन्यजीव संघर्ष टाळता येईल. शाळा–महाविद्यालयांमध्ये निसर्ग मंडळे स्थापन करून युवा पिढीला वाघ संवर्धनाशी जोडल्यास भविष्यातील संवर्धन अधिक बळकट होईल. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# चॅट जीपीटीला हे प्रश्न विचारू नका, नाहीतर याल अडचणीत

एआयमुळे अनेक कामे सोपी झाली आहेत. चॅटजीपीटी तुम्हाला काही सेकंदातच तुमच्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकते. आपली कामे सोपी झाली असली तरीही एआयवर एवढा विश्वास ठेवणे तुम्हाला अडचणीत आणू शकते. एआय प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यात तज्ञ आहे, पण चॅटजीपीटी आणि इतर एआय टूल्स प्रत्येक वेळी योग्य सल्ला देतात असं नाही. काही प्रश्न एआय टूलला कधीच विचारु नका. नाहीतर तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता.




चॅटजीपीटीवर तुम्ही जर शेअर बाजारात गुंतवणुकीचे प्रश्न विचारत किंवा सल्ले घेत असाल तर आताच बंद करा. एआय चा सल्ला तुम्हाला अडचणीत आणू शकतो. गुंतवणुकीच्या बाबतीत, एआयचा सल्ला घेण्याऐवजी, स्वतः संशोधन करणे आणि नंतर निर्णय घेणे चांगले, अन्यथा तुमचे नुकसानदेखील होऊ शकते.

**आरोग्याबाबत सल्ला घेऊ नका**

एआय टूल्स तुमच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे देत असले तरीही तुम्ही आरोग्याबाबत सल्ले अजिबात घेऊ नका. एआयकडून मिळणारा आरोग्य सल्ला तुम्हाला अडचणीत आणू शकतो, आजारावर उपचार घेण्यासाठी फक्त डॉक्टरांचा सल्ला घ्या.

तसेच जर तुम्ही कायदेशीर प्रकरणात चॅटजीपीटी किंवा एआयची मदत घेण्याचा विचार करत असाल, तर एआय टूल्सचे कायदेशीर मत चुकीचे ठरू शकते आणि तुम्ही अडचणीत येऊ शकता. कायदेशीर प्रकरणात तुम्ही एआय ऐवजी वकिलांचा सल्ला घ्यावा.

सध्या अनेक जण ट्रेंड फॉलो करत असतात. असे ट्रेंड फॉलो करुन तुम्ही जाळ्यात अडकू नको. काही दिवसापूर्वी घिबली ट्रेंड आला तेव्हा सर्वांनी हा ट्रेंड फॉलो केला.यावेळी चॅटजीपीटीवर त्यांचे वैयक्तिक फोटो अपलोड करायला सुरुवात केली. एआयने तुमच्यासाठी घिबली आर्टचा एक फोटो तयार केला पण या फोटोच्या मागे लागून तुम्ही तुमचा वैयक्तिक फोटो एआयला दिला, जो आज नाही तर उद्या कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येईल.


चॅट जीपीटीवर तुम्ही फक्त साधे प्रश्न विचारु शकता. प्रवासाचे नियोजन करण्यासाठी, अभ्यासात मदत करण्यासाठी, शहराबद्दल माहितीसाठी किंवा तुमचे कौशल्य सुधारण्यासाठी तुम्ही चॅटजीपीटी वापरू शकता.

# संगीतकार अशोक पत्की

गेली पन्नास वर्षे मराठी रंगभूमीवर गीतकार, संगीतकार म्हणून प्रवास करणारे अशोक पत्की. वैभवशाली संगीताचा वारसा जपणारा हा संगीतकार, जो पिढ्यान्‌पिढ्यांना आपला हक्काचा वाटला. संगीतातले विविध प्रकार ताकदीने हाताळून नाटकाचा आविष्कार रंगविण्याचे जबरदस्त कसब असणारा हा रंगप्रवासीच!

२५ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील गिरणी कामगार. मध्यमवर्गीय कुटुंब. खेतवाडीतल्या चाळीत घर. गोवा हिंदू असोसिएशनचा जमाना. संगीत नाटकासाठी पेटीवाल्याचा शोध सुरू होता. पंडित जितेंद्र अभिषेकींसोबत काम करण्याची संधी त्यातूनच त्यांना मिळाली. संगीत मत्स्यगंधापासून त्यांचे आणि पंडितजींचे सूर जुळले ते शेवटपर्यंत.

केवळ नाटकांचे संगीत, गाणं यापुरता त्यांचा वावर नाही तर त्यासोबत भावगीतांचे लेखन, चित्रपट, मालिका, जाहिराती, जिंगल्स, शीर्षकगीते असे अनेक प्रकार त्यांनी ताकदीने साकार केलेत. अगदी गर्दीतला पेटीवादक ते चित्रपट संगीतकार असा त्यांचा प्रवास. जो प्रत्येक वळणावर कल्पकता व कलात्मकता यांचा साक्षीदार ठरलाय. मराठी नाटकात संगीत रंगभूमीपासून ते गद्य नाटकापर्यंत तसेच



**निमित्त**


प्रायोगिक नाटकांपासून ते महानाट्यापर्यंतचा त्यांचा आवाका थक्क करून सोडणारा तसेच नव्या दिशा शोधणारा आहे

मोरूची मावशी' हे आचार्य अत्रे यांचे नाटक. हे धम्माल विनोदी नाटक दोनदा रंगभूमीवर आलं. त्यावर 'अत्रे पिक्चर्स' तर्फे चित्रपटही निघाला. पुनरुज्जीवनात १ जानेवारी १९८५ या दिवशी 'सुयोग' तर्फे शुभारंभ झाला. दिलीप कोल्हटकर यांचे दिग्दर्शन आणि संगीत दिग्दर्शन अशोक पत्की! जे तुफान गाजले. त्यातील विजय चव्हाण यांच्या 'टांग टिंग टिंगा'ला चक्क वन्समोअर मिळायचे. 'सुयोग' या नाट्यसंस्थेला या नाटकाने ओळख मिळाली.

'सुयोग'चे नंतरचे अत्रे यांचेच 'ब्रह्मचारी' नाटकही रंगभूमीवर आले. त्यातलाही वेगळेपणा रसिकांच्या नजरेत भरला. वर्षा उसगावकर आणि प्रशांत दामले या दोघांनी नाटक गाजविले. जुनी नाटके नव्या संचात आणि बदललेल्या वातावरणात सादर करतांना संगीतात, गाण्यात जे काही बदल करायचे ते पडद्यामागे त्यांनी केलेले. हे वेगळेपण असल्याने रसिकांचीही चांगली दाद मिळाली.

'सुयोग'चे सुधीर भट आणि गोपाळ अलगेरी यांच्याप्रमाणेच प्रशांत दामले यांच्याशीही चांगले 'स्वरसंबंध' त्यांचे जुळले गेलेत. आजही 'सारखं काहीतरी होतंय' यातही प्रशांत दामलेला गाणं म्हणायला लावलय आणि ताल धरत रसिक नाट्यगृहाबाहेर पडतात. 'माझ्या गाण्याचं शंभर टक्के श्रेय हे संगीतकार अशोक पत्की यांना आहे. त्याच्यामुळेच सारं काही शक्य होतं! असं प्रशांत दामले म्हणुनच वारंवार म्हणतात. अशोक पत्की यांनी या प्रदीर्घकाळात म्हणजे चक्क १९७२ पासून २५२ नाटकांचे पार्श्वसंगीत, ५०० पेक्षा जादा भावगीते, ३०० मालिकांची शीर्षकगीते, साडेपाच हजारावर जिंगल्स असा आविष्कार केलाय, जो चमत्कारच म्हणावा लागेल. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रोज रात्री छोटीशी लवंग खाणे फायद्याचे

लवंग एक असा मसाला आहे, ज्याचा वापर किचनमध्ये वेगवेगळ्या गोष्टींसाठी केला जातो, ज्यामुळे पदार्थांची टेस्ट वाढते. सोबतच लवंग शरीरालाही फायदे देते. खासकरून रात्री लवंग खाण्याचे अनेक फायदे मिळतात. अमेरिकेतील प्रसिद्ध डॉ. एरिक बर्ग यांनी रात्री लवंग खाण्याचे फायदे सांगितले आहेत.



डॉक्टरांनी यूट्यूब चॅनलवर याबाबत एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यात ते सांगतात की, छोटीशी लवंग आरोग्यासाठी रामबाण उपायासारखी काम करते. खासकरून रात्री लवंग खाणं किंवा तिचं पाणी पिणं शरीराला अनेक फायदे देतं.

चांगली झोप : लवंगात असे नॅचरल गुण असतात, जे मानसिक तणाव कमी करून मेंदू शांत ठेवतात, ज्यामुळे आपल्याला चांगली झोप लागते. झोप चांगली झाली, तर अनेक समस्या दूर होतात.

लिव्हर डिटॉक्स : शरीरातून विषारी तत्व बाहेर काढण्यासाठी लवंग मदत करते. खासकरून रात्री एक किंवा दोन लवंग चावून खाल्ल्यास किंवा याचं पाणी प्यायल्यास लिव्हरची सुद्धा आतून सफाई होते.

सर्दी–खोकला होतो दूर : डॉ. बर्ग सांगतात की, लवंग गरम असते आणि यात अँटी–बॅक्टेरिअल गुण असतात, जे घशातील खवखव, खोकला आणि कफ दूर करण्यास मदत करतात.

दात आणि हिरड्या होतात मजबूत : रात्री लवंग चावून खाल्ल्यास श्वासाची दुर्गंधी दूर होते. सोबतच तोंडाचं आरोग्य चांगलं राहतं तसेच दातांमध्ये होणारी वेदनाही दूर होते

इम्यूनिटी वाढते : वरील सगळ्या फायद्यांसोबतच डॉक्टर सांगतात की, रात्री लवंग खाल्ल्यानं किंवा याचं पाणी प्यायल्यानं यातील अँटी–मायक्रोबिअल गुण शरीराची इम्यूनिटी वाढवतात. ज्यामुळे अनेक रोगांचा धोका कमी होतो.

कसं बनवाल लवंगाचं पाणी?

चार ते पाच लवंग एक कप पाण्यात टाकून उकडा. पाच मिनिटांनंतर गॅस बंद करा. हे पाणी थंड झाल्यावर एक तासानं प्या. झोपण्याच्या ३० मिनिटांआधी हे पाणी प्यावं. याचा प्रभाव लवकरच शरीरात दिसू लागेल तसेच लवंग रोज थेट चावूनही खाऊ शकता.

लवंगाचे अनेक फायदे असले तरी जास्त प्रमाणात खाणं नुकसानकारक ठरू शकतं, कारण लवंग गरम असते. जर कुणाला ॲलर्जी असेल किंवा लवंगाचं पाणी पिऊन अस्वस्थ वाटत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# जलजीवन मिशनच्या कामाला गती

## सभापती विजया पाशिलकर यांच्याकडून न्हावे येथील बंधाऱ्याची पाहणी

**धाटाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला शाश्वत, नियमित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी रोहा पंचायत समितीच्या सभापती विजया पाशिलकर यांनी ग्रुप ग्रामपंचायत न्हावे हद्दीतील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या बंधाऱ्याची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी सभापती पाशिलकर यांनी बंधाऱ्याची सद्यस्थिती, पाणीसाठ्याची उपलब्धता, पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी तसेच भविष्यात गावातील नागरिकांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भविष्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी योजनेची कामे दर्जेदार, नियोजनबद्ध आणि निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. तर पाणी ही ग्रामीण जनतेच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज असल्याने जल जीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत नियमित पाणी पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशासन, पाणीपुरवठा विभाग आणि ग्रामपंचायतीने परस्पर समन्वय ठेवून कामाला गती देण्याची आवश्यकता असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

पाहणीप्रसंगी उपसभापती संजय मांडलुसकर, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता मयुर मालवाडे, नरेश भोईर, न्हावे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच नितीन डबीर, उपसरपंच पांडुरंग कासकर, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक दीपक वारगे, मुख्याध्यापक गणेश बिरवाडकर, शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी गावातील पाणीपुरवठ्याच्या समस्या, स्थानिक गरजा तसेच भविष्यातील पाण्याच्या वाढत्या मागणीबाबत आपल्या अपेक्षा मान्यवरांसमोर मांडल्या. जल जीवन मिशनच्या माध्यमातून गावातील प्रत्येक कुटुंबाला पुरेसा आणि शाश्वत पाणीपुरवठा मिळावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, पाहणी कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते गावातील क्रिकेट मैदानाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. जल जीवन मिशनच्या कामाची वरिष्ठ पातळीवरून प्रत्यक्ष पाहणी झाल्याने न्हावे गावाच्या पाणीप्रश्नाला आता अधिक गती मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पाताळगंगा एमआयडीसी वाहनतळावर तीन किलो गांजासह एकाला अटक

**चौक : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाताळगंगा एमआयडीसी परिसरातील वाहनतळावर पोलिसांनी कारवाई करत २ किलो ९०८ ग्रॅम गांजा जप्त केला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मौजे कराडे खुर्द गावाच्या हद्दीतील पाताळगंगा एमआयडीसी वाहनतळ परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणीया गणेश काशिनाथ म्हात्रे (वय४६ , रा. मोहोपाडा, ता. खालापूर जि.रायगड ) याच्या विरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातील काळ्या रंगाच्या बॅगेची तपासणी केली असता, चिकटपट्टीने गुंडाळलेले प्लास्टिकचे पाकीट आढळून आले. त्यामध्ये काळसर-हिरवट रंगाची पाने, फुले व काड्या असलेला उग्र वासाचा वनस्पतीजन्य पदार्थ आढळला.तपासणीमध्ये सदर पदार्थाचे वजन सुमारे २.९०८किलो ग्रॅम असल्याचे निष्पन्न झाले.यावेळी पोलिसांनी जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत २० हजार ९८० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

सदर अंमली पदार्थ विक्रीच्या उद्देशाने आरोपीने आपल्या ताब्यात बाळगल्याचा आरोप असून, त्यानुसार त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी ताब्यात घेण्यात आला आहे.गणेशला मंगळवार दि.२५ ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सदर कारवाई रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रकरणाचा पुढील तपास सपोनि प्रमोद जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये संगणक कक्षाचे उद्‌घाटन आणि विद्यार्थिनींचा गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा विभागातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दालने उपलब्ध होऊन या विद्यार्थ्यांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे हा उद्देश नजरेसमोर ठेवून ४० वर्षांपूर्वी सुरु करण्यात आलेल्या या संस्थेच्या सर्वोतोपरी उन्नतीसाठी मी असेन, खासदार तटकरेसाहेब असतील, आदितीताई असेल असे आम्ही सर्व तटकरे कुटुंबीय प्रयत्नशील राहून सहकार्य करू असे अभिवचन कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेचे आ.अनिकेत तटकरे यांनी मोर्बा येथील मॉडर्न इंग्लिश स्कुलच्या शैक्षणिक कार्यक्रमात बोलताना दिले.





माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असणाऱ्या मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कुलमध्ये रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांच्या माध्यमातून देण्यात आलेल्या २५ संगणक या संगणक कक्षाचे उदघाटन व सन २०२५ - २६ शैक्षणिक वर्षात १०वी शालांत परीक्षेत प्रथम आलेली विद्यार्थिनी सारा जावेद राऊत ९२ टक्के गुण,द्वितीय आलेली विद्यार्थिनी फर्जिन शौकत राऊत ८३ टक्के गुण व तृतीय आलेली विद्यार्थिनी मेहवीश मन्सूर अहमद बंदरकर ८०.८० टक्के गुण या प्रथम तीन आलेल्या विद्यार्थिनींचा गुणगौरव सोहळा सोमवार दि.२४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वा.आ.अनिकेत तटकरे यांच्याहस्ते झाला.

यावेळी उपस्थितांना आ.अनिकेत तटकरे यांनी मौलिक असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,जेष्ठ नेते शेखरशेठ देशमुख,संस्थेचे खजिनदार तथा जेष्ठ नेते इकबालशेट धनसे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काका नवगणे,माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे,जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी,पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम,सामाजिक कार्यकर्ते अल्ताफदादा धनसे,माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर,माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे,माजी सरपंच राजेंद्र शिर्के,देगावचे उपसरपंच दिनेश गुगले,इकबाल हर्णेकर,राजेंद्र जाधव,योगेश कर्मचारी,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत पोलिसांचा सणांच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च

**कर्जत : प्रतिनिधी**

आगामी सण उत्सवाच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी या दृष्टीने आज "दंगा काबू" योजना राबवून, कर्जत पोलिसांनी रूट मार्च काढला.

कर्जत पोलीस ठाण्याच्या वतीने ईद-ए-मिलाद तसेच रक्षाबंधन, दहीहंडी आदी संणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावीलाँग मार्चचे आयोजन केले होते. पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक - महावीर पेठ - जकात नाका - कर्जत बाजारपेठ - कापालेश्वर मंदिर आणि परत पोलीस स्टेशन असा रूट मार्च काढण्यात आला. या 'दंगा काबू' योजना व रूट मार्च करिता कर्जत पोलीस ठाणे कडील तीन पोलीस अधिकारी व १६ पोलीस अंमलदार तसेच आर सी पी प्लाटून कर्जत कडील जवान सहभागी झाले होते.





## पाहिजेत

DIPLOMA IN CIVIL / ELECTRICAL / MECHANICAL ENGINEERS

ONLY FRESHERS - 2026 PASS OUT

**SEND YOUR CV TO -**

prathamesh.kamble@adani.com



# अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर कार्यशाळा

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच करिअर कट्टा यांच्या सहकार्याने प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाने व अध्यक्षतेखाली 'कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यशाळा (एआय समित २०२६) चे आयोजन करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे आणि बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात याक्षेत्रातील संधींची ओळख व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी जी एम वेदक अभियांत्रिकी महाविद्यालय तळा येथील प्राध्यापक सरजिल सतवारे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी AI चे मूलभूत तत्त्व, त्याचे शिक्षण, उद्योग, आरोग्य, शेती आणि डिजिटल क्षेत्रातील उपयोग याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी AI क्षेत्रात आवश्यक कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला करिअर कट्टा चे श्री. यशवंत शितोळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ कॉमर्स श्रीवर्धनचे प्रभारी प्राचार्य दानिश संगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

करिअर कट्टाची ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने त्यांना प्रेरणा देणारी ठरली.

# सुधागड तालुका संरक्षण अधिकारीपद भरण्याची मागणी

## एकल मातांच्या मिशन वात्सल्य योजनेवर परिणाम

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील नगरपंचायत क्षेत्र वगळून ग्रामीण भागात केलेल्या व्यापक सर्वेक्षणात ३,७६३ एकल मातांची नोंद झाली आहे, मात्र तालुका संरक्षण अधिकारी हे पद रिक्त असल्यामुळे या सर्वेक्षणाचा डिजिटल डाटा अद्याप अपूर्णच आहे. यामुळे राज्य शासनाच्या 'मिशन वात्सल्य' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून एकल मातांच्या सक्षमीकरणाचा आणि बालसंरक्षणाचा मोठा पेच निर्माण झाला आहे.

सर्वेक्षणादरम्यान एकल मातांची वैयक्तिक माहिती, आर्थिक परिस्थिती, आवश्यक कागदपत्रे, बचत गट सदस्यत्व, शासकीय योजनांचे लाभ आणि स्वयंरोजगाराची इच्छा याबाबतची माहिती संकलित करण्यात आली. या माहितीच्या आधारे महिलांना थेट रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योगांशी जोडणे अपेक्षित होते, मात्र हा सर्व डाटा एक्सेल प्रणालीत अपडेट न झाल्यामुळे दरमहा होणाऱ्या तालुका समन्वय समितीच्या बैठकीत नेमकी कोणती माहिती समोर ठेवायची आणि आढावा कसा घ्यायचा, असा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे.

तालुका संरक्षण अधिकारी पद हे जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारीत येते. सुधागड तालुक्यातील हे पद रिक्त असून पूर्वी खालापूरच्या संरक्षण अधिकाऱ्यांकडे याचा अतिरिक्त कार्यभार होता. परंतु, महिन्याभरापूर्वी त्यांची बदली झाल्याने सद्यस्थितीत हे पद पूर्णपणे रिक्त आहे, अशी माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी तेजस्विता करंगुटकर यांनी दिली.

तालुका संरक्षण अधिकारी हा या सर्व योजनांचा मुख्य दुवा असतो. हे पद रिक्त राहिल्याने शासकीय मदतीचे वाटप, बालविवाह रोखण्यासाठी तातडीने होणारी कारवाई, अनाथ आणि वंचित बालकांना मिळणारे संरक्षण आणि एकल मातांचे आर्थिक पुनर्वसन या सर्व प्रक्रिया ठप्प झाल्या आहेत.

केवळ कागदोपत्री आकडेवारी न ठेवता या सर्वेक्षणाचे रूपांतर प्रत्यक्ष शासकीय मदत, रोजगार आणि आर्थिक सक्षमतेत होणे काळाची गरज आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील एकल मातांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि बालसंरक्षणाची यंत्रणा पूर्ववत चालवण्यासाठी येथे तत्काळ पूर्णवेळ तालुका संरक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिक व बाधित महिलांकडून केली जात आहे.



### पनवेल महानगरपालिका

तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६

**दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान**

**"जाहीर आवाहन"**

**पनवेल महानगरपालिकेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत ( फेरजाहिरात व शुद्धीपत्रक)**

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम - २०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ मधील तरतुदीनुसार तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कडील दिनांक १०/०८/२०२६ च्या प्राप्त पत्रानुसार महानगरपालिकेमध्ये "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. " तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | पद संख्या | अ.क्र. | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | १ | सदर व्यक्ती पस्तीस वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल. The person is above thirty five years but is not more than sixty five years of age; |
| | | २ | सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असेल. The person possesses a Bachelor's degree from a recognized University; |
| | | ३ | सदर व्यक्तीला स्थानिक प्राधिकरणांमधील कामाचा अनुभव असेल किंवा शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल. The person has worked in local self-Government or as an officer not below the rank of Under Secretary to the Government or equivalent, having experience in local authority, |
| | | ४ | सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, The person of ability, integrity and standing and has adequate knowledge or experience of, at least, ten years in social work or in dealing with the problems relating to street vendors or of public affairs or of municipal or public administration; |

तरी, पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिका आवक-जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाच्या शेजारी शॉपिंग कॉम्प्लेक्स दत्त झेरॉक्स च्या वर दुसरा मजला येथे संपर्क साधावा.

जा.क्र/पमपा/DAY-NULM/SUSV/२४२६/
प्र.क्र.२४/१४४७/२०२६
दिनांक २४/०८/२०२६

**सही/-**
**(अभिषेक पराडकर)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका





### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे लोणिवली,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे लोणिवली,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | रू.पै. |
| ११६/४ | ०.३९.५० | ०.०६.३० | ०.४५.८० | ६.०० |
| ११७/४ | ०.४९.९० | ०.०४.४० | ०.५४.३० | १.२५ |
| ११९/१/अ | ०.४३.०० | ०.१७.५० | ०.६०.५० | ७.६९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९





### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील रंजीत अनंता ठाकूर वगैरे मौजे लोणिवली, ता. पनवेल येथील खालील वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, ता.पनवेल, जि. रायगड.**

| मौजे | भोगवट धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| लोणिवली | शारदा भूषण खोपकर<br>अनिल दिनकर पवार<br>सुनिता दिनकर पवार<br>सुनिल दिनकर पवार<br>अंजना नारायण सावंत<br>दर्शना अरुण सुर्वे | १०१ | ३ | ०-१३-४० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **३०** दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि.. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावा्यात. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
ता. २४/०८/२०२६

**सही /-**
**ॲड. के. के. गोंधळी**
३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता.पनवेल, जि.रायगड.
मोबाईल : ९८२०२७३६९१

# कॅम्पस कनेक्ट पोस्टर स्पर्धेत रामशेठ ठाकूर स्कूलची तुहिना प्रथम

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव; २१ हजारांचे पारितोषिक




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता अकरावी (PCB)मध्ये शिक्षण घेणाऱ्या तुहिना एम. ह्या विद्यार्थिनीने उत्स्फूर्त सहभाग घेऊन नवी मुंबई पोलिसांच्या 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रमांतर्गत आयोजित पोस्टर मेकिंग स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तिच्या या यशामुळे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या कॅम्पस कनेक्ट उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पोस्टर निर्मिती स्पर्धेत तुहिनाने 'अमली पदार्थांचे व्यसन' या सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण व विचारप्रवर्तक विषयावर प्रभावी पोस्टर साकारले. तिच्या सर्जनशील मांडणीची आणि सामाजिक संदेशाची दखल घेत तिला स्पर्धेत प्रथम क्रमांक घोषित करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल तुहिनाला प्रमाणपत्र तसेच २१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. शनिवारी (दि.२२) झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तुहिनाचा विशेष सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान मिळणे ही विद्यार्थ्यांच्या यशाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी बाब ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तुहिनाचे अभिनंदन केले. शैक्षणिक अभ्यासासोबतच विविध स्पर्धा, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक व सर्जनशील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी सातत्याने प्रेरणा व प्रोत्साहन मिळते. व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कौशल्यांना व्यापक व्यासपीठ मिळत आहे. प्राचार्य राज अलोनी यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्याबद्दलही विद्यार्थिनीने कृतज्ञता व्यक्त केली.

अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर मिळालेला हा सन्मान तुहिनासाठी तसेच तिच्या कुटुंबीयांसाठी, शिक्षकवर्गासाठी आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. तुहिनाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# तुर्भे येथे सर्व्हिस रोडवर डेब्रिज टाकणाऱ्यांवर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे येथे सर्व्हिस रोडवर डेब्रिज टाकणाऱ्यांवर तुर्भे विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे यांनी धडक कारवाई केली. सिडकोने डेब्रिज माफियांवर जोरदार कारवाई सुरू केल्यामुळे मुंबईतून आणि नवी मुंबईतून वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. हे डेब्रिज माफिया नवी मुंबई आणि मुंबई उपनगरातील डेब्रिज उलवे आणि अन्य परिसरात रातोरात टाकून पसार होत आहेत. त्यामुळे सिडकोच्या भूखंडांवर मोठ्या प्रमाणात डेब्रिजचे डोंगर उभे राहत आहेत. याची नोंद घेत गेल्या काही दिवसांपासून सिडकोच्या दक्षता विभागामार्फत डेब्रिज माफियांवर धडक कारवाई चालू करण्यात आली आहे.

परिणामी नवी मुंबईतील डेब्रिजमाफियाही अडचणीत आले आहेत. सध्या नवी मुंबईमध्ये सीबीडी, नेरूळ, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे आदी परिसरात मोठ्या प्रमाणात पुनर्विकास चालू आहे. त्याचबरोबर गावठाण आणि अन्य भागातही बांधकामे चालू आहेत. ही जुनी बांधकामे तोडून निर्माण झालेले डेब्रिज टाकण्यासाठी महापालिका किंवा सिडकोकडे म्हणावे तितके मोकळे भूखंड उपलब्ध नाहीत. परिणामी धडक कारवाईनंतर काही डेब्रिज माफियांनी शहरातील अंतर्गत रस्ते तसेच मुख्य मार्ग आणि सायन-पनवेल महामार्गावर रातोरात डेब्रिजचे डंपर खाली करून पळ काढण्यास सुरुवात केली आहे.

सध्या शहरातील अनेक रस्त्यांच्या कडेला डेब्रिजचे डंपर खाली झाल्याचे पाहावयास मिळत आहे. यामध्ये विशेषतः पामबीच मार्गालगतच्या खारफुटीमध्ये अधिक प्रमाणात डंपर खाली केले जात असल्याचे सूत्रांकडून समजते. अशाच प्रकारे मागील आठवड्यात नेरूळ सेक्टर सिग्नलकडून वाशी कडे येताना डाव्या बाजूला खारफुटीमध्ये एका टेम्पोतून डेब्रिजच्या गोण्या खाली केल्या जात होत्या. याची माहिती मिळताच नेरूळ विभाग कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन संबंधित टेम्पो जप्त केला. तसेच त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली.

त्याचप्रमाणे रात्री तुर्भे येथील एपीएमसी सिग्नल ते तुर्भे डेपोकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर डेब्रिज टाकण्यात आले होते. याची माहिती मिळताच सागर मोरे यांनी पथकासह घटनास्थळी पाहणी केली. तसेच डेब्रिज टाकणाऱ्याचा शोध घेऊन त्याची गाडी जप्त करत दंडात्मक कारवाई केली.

# पनवेल रेल्वे पोलिसांचे जीवन रक्षा अभियान

### रूट मार्चद्वारे सुरक्षिततेचा संदेश

**पनवेल : वार्ताहर**

लोकल पकडण्याच्या घाईत प्रवाशांकडून रेल्वे रुळ ओलांडण्याचे प्रकार घडू नयेत तसेच अपघाती मृत्यू व दुखापतींचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी पनवेल रेल्वे पोलिसांच्या वतीने 'जीवन रक्षा अभियान' राबविण्यात आले. याद्वारे प्रवाशांना रेल्वे नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवासाचे आवाहन करण्यात आले.

पनवेल रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक २ व ३च्या सीएसएमटी दिशेकडील भागात जनजागृती मोहीम राबविण्यात आली. काही प्रवासी रेल्वे रुळ ओलांडण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वे पोलिसांनी स्थानक परिसरात मानव साखळी, रूट मार्च व पोलिसिंग करून जनजागृती केली. यात तीन पोलीस उपनिरीक्षक, २८ पोलीस अंमलदार व १० होमगार्ड सहभागी झाले होते.

'अवाजवी धाडस टाळा, जीवन अनमोल आहे', 'रेल्वे रुळ ओलांडू नका, घरी कोणीतरी तुमची वाट पाहत आहे', 'रेल्वेचे नियम पाळा, अपघात टाळा' आणि 'वेळ वाचविण्यासाठी आयुष्य धोक्यात घालू नका' अशा संदेशांद्वारे प्रवाशांचे लक्ष वेधण्यात आले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील एनएसएस युनिट व डॉ. आर. न. कूपर हॉस्पिटल आणि ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने सोमवारी (दि. २४) सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्वइच्छेने रक्तदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये रुजविणे आणि गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यास हातभार लावणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

"रक्तदान हेच जीवनदान" या सामाजिक संदेशातून विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर



कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदानापूर्वी आवश्यक वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच रक्तदात्यांना रक्तदानाचे महत्त्व आणि त्याचे सामाजिक फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी एनएसएस स्वयंसेवक आणि समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. नोंदणी, नियोजन, रक्तदात्यांना मार्गदर्शन आणि शिबिराचे व्यवस्थापन यामध्ये स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्य लाभले. सामाजिक उपक्रमाचे आयोजन तसेच समितीचे समन्वयक डॉ. महादेव चव्हाण व प्रा. नीलम मोरे तसेच समितीतील इतर सदस्य प्रा. आनंद शेलार, प्रा. शुभांगी ठाकूर, प्रा. रेहनुमा खान, प्रा. मृणाली ऐवळे तसेच रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मानवता, सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि समाजाप्रति असलेली जबाबदारी यांची भावना अधिक दृढ झाली.

रक्तदान शिबिराच्या माध्यमातून महाविद्यालयाने समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत "रक्तदान करा, जीवन वाचवा" हा प्रेरणादायी संदेश यावेळी दिला.

# उरणमध्ये श्रावणी सोमवारनिमित्त शिवमंदिरात भाविकांची गर्दी

**उरण : वार्ताहर**

श्रावणी दुसरा सोमवार असल्याने उरण तालुका तसेच ग्रामीण भागात महादेवाच्या मंदिरात भक्तांनी सकाळपासूनच दर्शनासाठी



गर्दी केली होती. उरण शहरातील देवूळवाडी येथील संगमेश्वर, बोरी गावातील होणेश्वर, रेल्वे स्टेशन जवळील निलकंठेश्वर, केगाव येथील माणकेश्वर, जेएनपीटी येथील शेव्याचा शंकर मंदिर आदी मंदिरांत 'ओम नमः शिवाय'चा जयघोष भक्त करीत असल्याचे दिसत होते.

ठिकठिकाणी साबुदाणा खिचडी, तर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. माणकेश्वर येथे मंदिराजवळ नारळ, बेल, दूध, हार यांची दुकाने थाटण्यात आली होती. माणकेश्वर येथे दुसऱ्या सोमवारी प्रेरणा सुमेध पाटील व दर्शन मनोहर म्हात्रे यांच्या वतीने भाविकांसाठी संपूर्ण दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ठिकठिकाणी पूजा, अभिषेक सुरू होते. महादेवाच्या मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. माणकेश्वर मंदिर स्वयंभू असल्याने भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

# सभापती रवींद्र भगत यांच्याकडून गणेशोत्सव तयारीची पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'अ' चे नवनिर्वाचित सभापती रवींद्र भगत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम प्रभागातील नागरी सुविधा आणि आगामी गणेशोत्सवाच्या तयारीची थेट जागेवर जाऊन पाहणी केली. सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या या पहिल्याच प्रभाग दौऱ्यादरम्यान त्यांनी गणरायाचे आगमन आणि विसर्जन मार्ग, रस्ते, विद्युत व्यवस्था, आरोग्य व स्वच्छता यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या घटकांची बारकाईने पाहणी केली.

गणेशोत्सवाच्या काळात गणेशभक्तांना तसेच नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी विसर्जन मार्गांवरील खड्डे बुजवून रस्ते त्वरित सुस्थितीत आणावेत आणि दिवाबत्तीची योग्य सोय करावी, अशा स्पष्ट व आवश्यक सूचना त्यांनी उपस्थित पालिका अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी नगरसेवक दिनेश खानावकर, नगरसेविका सरस्वती काथारा तसेच महेश पाटील, हरिभाऊ पाटील, वासुदेव पाटील, सागर पाटील, अश्विन पाटील, राजेश पाटील, कृष्णाशेठ पाटील, अशोक शेळके, दीपक म्हात्रे आणि प्रवीण खानावकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




## नयनी श्रावणधारा जागवू प्रतिबिंब

आला श्रावण रुखवत मांडून,
अंबर धरेचे मिलन घडवून
मनाची कवाडं आता उघडुन,
अनुभूती शब्दबद्ध करावीच सांगून!

आला आला श्रावण आला,
सृष्टीला संजीवन देण्या आला
आगत स्वागत करूया सारे
मनः चक्षुंना श्रावणाचे वेड न्यारे!

श्रावणधारा सोनसळी हिरवीगार रानेवने,
नवकाव्यास सुसंधी साहित्यप्रेमींना आवाहने
स्वरचित काव्यपंक्ती असेल आगळवेगळी,
निसर्गाची हाक असतेच जगावेगळी!

सृष्टिशी नातं जोडून बघाच,
निसर्गाची साद आपुलकीनं ऐकाच
सृष्टीचे सौंदर्य पवित्र पसायदान,
ओंजळभर देण्याचे औदार्य महान!

एक रोप लावून बघाच,
झाड एकच जोपासून दाखवाच
मित्रमैत्रिणींना आप्तांना भेट द्यावी,
फुल फळझाड निगुतीने जोपासावी!

दत्तक घ्याच एक झाड,
समाजप्रबोधन धरेसाठी डोईवर पहाड
सामाजिक भान राखायला हवेच,
उदात्त विचार आचारात बदलायचे!

मारुयात वृक्षाला एकच मिठी,
सोडवाच हातून कुऱ्हाड काठी
ऊन पावसाचा खेळ छान,
इंद्रधनू आकाशी होतसे विराजमान!

काय "ते सौंदर्य" कसे सांगू
पांथस्थ धरेवर अजुन "काय मागू
कृतघ्नपणा विसरून स्वार्थास
तिलांजली, उत्सवांची श्रावणात
असते मांदियाळी!

श्रावणात घन-निळा करितो ओलेचिंब,
नयनी श्रावणधारा जागवू प्रतिबिंब
वृक्ष-संवर्धन संगोपन भविष्यकालीन संवेग,
शून्य-प्रदूषण सर्वंकष असावा आवेग!



-संजीव काळकर,
पनवेल

# रंगीबेरंगी राख्यांनी सजली पनवेलची बाजारपेठ



**पनवेल : वार्ताहर**

रक्षाबंधन सणाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पनवेल शहरातील विविध बाजारपेठांमध्ये राख्यांची दुकाने सजली आहेत. यंदा २८ ऑगस्टला रक्षाबंधन साजरे होणार असल्याने बाजारपेठेत राख्यांची खरेदी करण्यासाठी ग्राहकांची लगबग सुरू झाली आहे. पनवेलच्या भाजी मार्केटसह विविध भागांतील दुकानांमध्ये रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्यांचे विविध प्रकार उपलब्ध झाले आहेत.

लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या आवडीचा विचार करून राख्यांचे विविध डिझाइन बाजारात दाखल झाले आहेत.पारंपरिक रेशमी धाग्याच्या राख्यांसोबतच मोती, खडे, आकर्षक डिझाइन, कार्टूनची चित्रे आणि विविध रंगसंगती असलेल्या राख्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. यंदा लाईट लागणाऱ्या राख्या विशेष आकर्षण ठरत असून, लहान मुलांमध्ये त्यांना अधिक पसंती मिळत आहे. काळ्या धाग्याच्या तसेच काळ्या मण्यांच्या राख्यांनाही ग्राहकांकडून मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

पूर्वी काळ्या गोंड्याच्या राख्यांना पसंती होती, मात्र बदलत्या काळानुसार राख्यांच्या स्वरूपातही बदल झाला. आधुनिकतेची जोड देत विविध प्रकारच्या डिझायनर राख्या बाजारात आल्याने ग्राहकांना निवडीचे पर्याय मिळत आहेत. पुढील दिवसांत राख्यांच्या खरेदीला वेग येण्याची शक्यता असून बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# एमपीएससीत यशस्वी झालेल्या पूजा म्हात्रेचा सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे वतीने मंडळाच्या कार्यालयात खांदा गावातील रिक्षाचालक बाळकृष्ण म्हात्रे यांची मुलगी पूजा हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) राज्य कर निरीक्षक परीक्षा राज्यात १५व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पूजाने जिद्दीने गाठलेल्या यशाचा समाजालाही उपयोग होऊ दे, असे सांगून लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करावा व योग्य तो बोध घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.
मंडळाचे उपाध्यक्ष जे. डी. तांडेल यांनीही आपण शिक्षण घेतले त्यावेळी व नंतर केलेल्या कष्टाची व यशाची महती सांगितली. जनजागृती ग्राहक मंचाचे माजी अध्यक्ष के. एल. जाधव यांनी अकाउंट विभागाच्या नोकरीसाठी घेतलेले खडतर प्रयास सांगितले. हेमंत पाटील यांनी आपल्या जीवनाचा अनुभव सांगत आपला शैक्षणिक प्रवास किती खडतर होता याबद्दल सांगितले. ते स्वतः आगरी समाजातील पहिले ग्रॅज्युएट इंजिनियर आहेत.

पूजाला एच. एल. पाटील, शिवदास पालकर, राजकुमार ताकमोगे, डी. टी. जाधवर, डी.बी. पाटील यांनी शुभेच्छा व मार्गदर्शन केले. या सत्कार समारंभासाठी पूजाबरोबर तिचे आईवडील, मावशी व बहिणी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन मंडळाचे कोषाध्यक्ष विजय द. गायकर यांनी केले. आयोजनासाठी सदस्य मेघा तांडेल, विद्याधर पाटील यांनी मेहनत घेतली.

# भारताचा पहिला डाव पाचशेपार

## ध्रुव जुरेलचे शानदार शतक, श्रीलंकेला प्रारंभिक धक्के



**कोलंबो : वृत्तसंस्था**

ध्रुव जुरेल याने कोलंबो कसोटीच्या पहिल्या डावात शानदार शतक झळकावले. त्याचे हे ऐतिहासिक शतक ठरले. ध्रुव पहिल्या डावात नाबाद ११५ धावांची खेळी करत माघारी परतला आणि ५०३ धावांवर भारताने पहिला डाव घोषित केला.

कोलंबोमधील फलंदाजीसाठी अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर जुरेलने संथ व संयमी सुरुवात केली. पडिक्कल बाद झाल्यानंतर तो फलंदाजीसाठी आला आणि आपल्या उत्कृष्ट टेक्निकच्या बळावर त्याने धावसंख्या पुढे नेली. जुरेलने रवींद्र जडेजा व नंतर ऋषभ पंतसह भारताचा डाव सावरला. जुरेल व पंत यांनी शतकी भागीदारी साकारली आणि भारताचा डाव ४०० धावांच्या पलीकडे नेला. इतक्यात तो थांबला नाही आणि त्याने संघाला ५०० धावांच्या पलीकडे नेत नाबाद परतला.

ध्रुव जुरेलचं हे शतक ऐतिहासिक ठरले, कारण श्रीलंकेच्या भूमीवर कसोटी शतक झळकावणारा तो पहिलाच भारतीय यष्टिरक्षक ठरला आहे. यापूर्वी २०१०मध्ये महेंद्रसिंह धोनीने श्रीलंकेत ७६ धावांची खेळी केली होती. जुरेलने सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ही कामगिरी केली. श्रीलंकेत एखाद्या भारतीय खेळाडूने या क्रमांकावर फलंदाजी करून शतक झळकावण्याची ही पहिलीच वेळ आहे.

विदेशात सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावणारा ध्रुव जुरेल हा केवळ सातवा भारतीय फलंदाज आहे. कपिल देव आणि ऋषभ पंत यांनी ही कामगिरी दोनदा केली आहे. जुरेलने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच ही कामगिरी केली. यापूर्वी २०२२मध्ये जडेजाने विदेशात सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक केले होते.

या खेळीसह श्रीलंकेतील मैदानांवर सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना सर्वोच्च धावसंख्या करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो चौथ्या क्रमांकावर पोहचला आहे. न्यूझीलंडच्या रिचर्ड हॅडली यांनी १९८७मध्ये कोलंबोतील एसएससी मैदानावर सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना १५१ धावांची खेळी केली होती. त्यानंतर २००९मध्ये याच मैदानावर न्यूझीलंडच्या डॅनियल व्हिटोरीने १४० धावा, तर २०२३मध्ये पाकिस्तानच्या सलमान अली आघाने नाबाद १३२ धावा केल्या होत्या. या फलंदाजांनंतर जुरेल ११५ धावांसह चौथ्या क्रमांकावर आहे.

भारताने पाचशेपार धावांचा डोंगर उभारल्यानंतर श्रीलंकेने आपला पहिला डाव सुरू केला, मात्र सलामीवीर लहिरी उदारा सहा चेंडूत अवघी एक धाव करून प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर परतला. यानंतर फलंदाजीला आलेला प्रभात जयसुर्याही केवळ दोन धावा करून बाद झाला. त्याला मानव सुथारने पायचीत केले. यानंतर आता कमिल मिश्रा पाच धावा करून खेळत आहे. लंकेच्या आठ धावांवर दोन विकेट्स पडल्या आहेत.



## उरणच्या अभय ठाकूरला जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दुहेरी 'सुवर्ण'

**उरण : बातमीदार**

थायलंडमधील चियांग माई येथे आयोजित जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उरणमधील खोपोटे येथील अभय धनाजी ठाकूर याने दोन सुवर्णपदके पटकावली. संपूर्ण देशासाठी हा अभिमानाचा क्षण आहे.

अभय ठाकूरने ७५ किलो वजन गटातील बेंच प्रेस प्रकारात २०० किलो वजन लिफ्ट उचलून भारतासाठी सुवर्णपदक पटकाविले तसेच इक्विप्ड बेंच प्रेस प्रकारातही सुवर्णपदक जिंकले. या दमदार कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे. त्याने यशाचे श्रेय नातेवाईक, मिस्टर इंडिया मिस्टर वर्ल्ड पदकाचे मानकरी प्रतिक दर्णे, इंडिया मिस्टर, एशिया मिस्टर, वर्ल्ड मिस्टर पदकाचे मानकरी भूषण पाटील, तौरस जिम फॅमिली, मित्र परिवार यांना दिले आहे.

## पनवेलच्या जलतरणपटूंची राज्यस्तरावर चमकदार कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील रॉयल कॉस्मो येथे जलतरणाचे प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक व खासगी शाळा निमंत्रित जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विविध पदकांची कमाई केली. ही स्पर्धा नुकतीच पुणे येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी-म्हाळुंगे येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत ओम हेमंत नलावडे याने दहा वर्षांखालील वयोगटात १०० मीटर मुक्त जलतरण प्रकारात सुवर्णपदक आणि ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात रौप्यपदक पटकावले.

अंश कांबळे याने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात कांस्यपदक, तर ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात रौप्यपदक मिळवले. याशिवाय निवांत वर्मा याने ५० मीटर मोनोफिन प्रकारात कांस्यपदक जिंकले. या तिन्ही खेळाडूंना राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे जलतरण प्रशिक्षक तसेच राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू एनआयएस प्रशिक्षक हसन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जलतरणाचे प्रशिक्षण घेत आहेत. सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

## जैस्वाल-फर्नांडो यांना आयसीसीने ठोठावला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलंबोमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी यशस्वी जैस्वाल आणि असिथा फर्नांडो यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. आयसीसीने या घटनेची दखल घेत दोन्ही खेळाडूंना दंड ठोठावला आहे.

आयसीसीने जाहीर केले की, यशस्वी जैस्वाल आणि असिथा फर्नांडो यांना त्यांच्या सामना शुल्काच्या (मॅच फी) २५ टक्के दंड आणि प्रत्येकी एक 'डिमेरिट पॉइंट' ठोठावण्यात आला आहे. ही शिक्षा सौम्य असल्याचे मानले जात आहे, कारण या दोन्ही खेळाडूंनी गेल्या २४ महिन्यांत यापूर्वी कोणताही गुन्हा केलेला नाही.

## ऋषभ पंतने मोडला धोनीचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा धडाकेबाज यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने पुन्हा एकदा आपल्या खेळाच्या जोरावर इतिहास रचला आहे. कोलंबो येथील सिंहलीज क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यात खेळल्या जात असलेल्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात पंतने भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा एक मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

परदेशात आणि तटस्थ ठिकाणी खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यांमध्ये यष्टीरक्षक म्हणून सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत आता ऋषभ पंत अव्वल स्थानी पोहचला आहे. पंतच्या नावावर परदेशात २५०१ धावांची नोंद झाली असून त्याने



धोनीला (२४९६ धावा) मागे सोडले आहे. या ऐतिहासिक यादीत फारूख इंजिनिअर (१२०९ धावा) तिसऱ्या, सय्यद किरमानी (११०९ धावा) चौथ्या आणि किरण मोरे (९०१ धावा) पाचव्या स्थानावर आहेत. विशेष म्हणजे, पंतने ४१.६८च्या उत्कृष्ट सरासरीने ही कामगिरी केली आहे, जी या यादीतील सर्व भारतीय यष्टीरक्षकांमध्ये सर्वोत्तम आहे.

कोलंबो कसोटीच्या पहिल्या दिवशी श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज लाहिरू कुमारच्या एका उसळत्या चेंडूवर डाव्या हाताला चेंडू लागल्याने ऋषभ पंत गंभीर दुखापतग्रस्त झाला. वेदना सहन करत त्याला ५८व्या षटकात १५ चेंडूत तीन धावा काढून फिजिओथेरपिस्टसोबत मैदानाबाहेर जावे लागले होते, परंतु दुसऱ्या दिवशी जिद्द आणि चिकाटीचे दर्शन घडवत पंत पुन्हा फलंदाजीसाठी मैदानावर उतरला. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी आखूड चेंडूंचा मारा करून त्याची पुन्हा परीक्षा घेतली आणि ड्रिंक्स ब्रेकपूर्वी त्याच्या खांद्यालाही दुखापत झाली. असे असतानाही पंतने हार मानली नाही. त्याने ध्रुव जुरेलसोबत मिळून संघाचा डाव सावरला आणि महत्त्वाची भागीदारी रचत ड्रिंक्स ब्रेकपर्यंत संघाच्या धावसंख्येत भर घातली.

### 'डब्ल्यूटीसी'मध्ये जडेजाला टाकले मागे

ऋषभ पंतने या सामन्यात आपले २१वे कसोटी अर्धशतक झळकावले. तो आपला ५२वा कसोटी सामना खेळत आहे. २८ वर्षांच्या पंतने ४२ डब्ल्यूटीसी सामन्यांत २४ वेळा अर्धशतकी खेळी केली आहे. यातील सहावेळा तो आपले अर्धशतक शतकात रूपांतरित करू शकला, तर १८ वेळा त्याने ५०पेक्षा जास्त धावा केल्या. पंतने भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाला मागे टाकले. जडेजाने आतापर्यंत ५० डब्ल्यूटीसी सामन्यांत २३ वेळा ५०पेक्षा जास्त धावांची मजल मारली. यात १८ वेळा अर्धशतकी खेळी, तर पाच वेळा शतकी खेळीचा समावेश आहे.

## रायगड जिल्हास्तरीय वुशू अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात वुशू या क्रीडा प्रकाराचा प्रचार, प्रसार आणि खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली पहिली रायगड जिल्हास्तरीय सब-ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर वुशू अजिंक्यपद स्पर्धा रविवारी (दि. २३) नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात झाली.

या स्पर्धेला रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १८०हून अधिक खेळाडूंनी विविध वयोगट व क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदविला. खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याचे आणि क्रीडानैपुण्याचे प्रदर्शन करत स्पर्धेची रंगत वाढवली.

स्पर्धेस यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष आमले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रात सातत्य, शिस्त, मेहनत आणि खिलाडूवृत्ती यांचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण व जिल्हास्तरावरील खेळाडूंना मोठ्या स्पर्धांसाठी संधी उपलब्ध करून देणे ही




काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनचे आधारस्तंभ एस.एस. कटके, अध्यक्ष एस.व्ही. खर्डेकर, महासचिव एल.एस. कटके यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

स्पर्धेतील तांत्रिक नियोजन व पंचांची जबाबदारी पार पाडण्यासाठी मुंबई व ठाणे जिल्ह्यातून अनुभवी पंच व तांत्रिक अधिकारी उपस्थित होते. स्पर्धेचे तांत्रिक निरीक्षण करण्यासाठी वुशू असोसिएशन ऑफ ठाणे डिस्ट्रिक्टचे सचिव अजित म्हात्रे उपस्थित होते. खेळाडूंसोबत मार्गदर्शक म्हणून निलेश भोसले, प्रतीक कारंडे, लतिका गमरे तसेच उरण तालुक्यातून वैभव उपस्थित होते.

या स्पर्धेत युनायटेड वुशू अकॅडमी, किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्स, सेंट मेरीज मल्टीपर्पज हायस्कूल वाशी, एसएनजी इंटरनॅशनल स्कूल उलवे, एमपीएएससी अकॅडमी उरण, एमपी वुशू अकॅडमी खांदा कॉलनी, माणगाव वुशू अकॅडमी यांच्यासह रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील खेळाडू व संघांनी सहभाग घेतला.

या जिल्हास्तरीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंना ४ ते ७ सप्टेंबर रोजी आळंदी, पुणे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या २३व्या सब-ज्युनिअर व २४व्या ज्युनिअर वुशू अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७मध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेचे यशस्वी आयोजन व नियोजन करण्यासाठी वुशू असोसिएशन पनवेल रायगडचे सचिव स्वप्नील वारंगे, आयोजक स्मितल पाटील, प्रतीक्षा शेरकर, विशाल खुटवड, राजेश मुंढे यांनी मेहनत घेतली.

### संघनिहाय अजिंक्यपदाचे मानकरी

*स्पर्धेतील सांसू प्रकारात संघनिहाय अजिंक्यपदाच्या लढतीत युनायटेड वुशू अकादमीने प्रथम क्रमांक पटकावत अजिंक्यपद मिळविले. सेंट मेरीज स्कूलने द्वितीय क्रमांक, तर एमपीएएससी अकादमी, उरण आणि माणगाव वुशू अकादमी यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळविला. ताउलू प्रकारात एसएनजी इंटरनॅशनल स्कूल, उलवेने प्रथम क्रमांक पटकावत अजिंक्यपद मिळविले. सेंट मेरीज स्कूलने द्वितीय, तर किंग मार्शल आर्ट्स अकादमी अँड स्पोर्ट्सने तृतीय क्रमांक मिळविला.*

## ईस्ट बंगालने ड्युरंड चषक जिंकला




**कोलकाता : वृत्तसंस्था**

ड्युरंड चषक २०२६च्या अंतिम सामन्यात ईस्ट बंगालने आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी मोहन बागान सुपर जायंटचा ४-१ असा दारुण पराभव केला. या दणदणीत आणि एकतर्फी विजयासह ईस्ट बंगालने तब्बल २२ वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवत ऐतिहासिक ड्युरंड चषकावर आपले नाव कोरले.

अंतिम सामन्याच्या पूर्वार्धात एडमंड लालरिंडिकाने नोंदवलेली जबरदस्त हॅट्ट्रिक आणि बिपिन सिंगच्या आक्रमक खेळाच्या बळावर ईस्ट बंगालने पहिल्या ४५ मिनिटांतच सामन्यावर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. सामन्याच्या १०व्या मिनिटाला मोहम्मद रशीदने दिलेल्या सुंदर थ्रू-बॉलवर विंगर बिपिन सिंगने चेंडूला गोलपोस्टच्या उजव्या कोपऱ्यात धाडून ईस्ट बंगालचे खाते उघडले. या धक्क्यातून मोहन बागान सावरण्याआधीच, केवळ दोन मिनिटांनंतर (१२व्या मिनिटाला) एडमंड लालरिंडिकाने पेनल्टी बॉक्सबाहेरून अप्रतिम फटका मारत संघाची

### मोहन बागानची धूळधाण!

आघाडी २-० अशी दुप्पट केली. २२व्या मिनिटाला एडमंडने पुढे येणाऱ्या गोलरक्षक विशाल कैथला चकवून चेंडू रिकाम्या जाळ्यात ढकलत ३-० अशी मजबूत आघाडी मिळवून दिली.

३३व्या मिनिटाला मोहन बागानच्या मनवीर सिंगने उजव्या बाजूने उत्कृष्ट मुसंडी मारत ईस्ट बंगालच्या जाळ्यात चेंडू धाडला आणि पिछाडी १-३ अशी कमी केली, मात्र मध्यंतराच्या ठीक आधी (४४व्या मिनिटाला) एडमंडने आपली हॅट्ट्रिक पूर्ण करत ईस्ट बंगालला ४-१ अशी भक्कम आघाडी मिळवून दिली.

### पराभवाचा वचपा काढत इतिहास घडवला

या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात मोहन बागानने ईस्ट बंगालचा १-० असा पराभव केला होता, मात्र अंतिम फेरीत ईस्ट बंगालने त्या पराभवाचा सव्याज वचपा काढला. यापूर्वी २००४मध्ये नवी दिल्लीतील आंबेडकर स्टेडियमवर पार पडलेल्या अंतिम फेरीत ईस्ट बंगालने मोहन बागानला २-१ने हरवून ड्युरंड चषक जिंकला होता. स्वातंत्र्योत्तर काळात १९५१मध्ये पहिल्यांदा ही स्पर्धा जिंकणाऱ्या ईस्ट बंगालने तब्बल २२ वर्षांनंतर पुन्हा एकदा इतिहास घडवला आहे.

## इंग्लंडमध्ये पुन्हा नाईट क्लब राडा!

### स्टार गोलंदाजाला पोलिसांनी पकडून नंतर सोडले

**डर्बी : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि सनाईजर्स हैदराबादचा स्टार गोलंदाज ब्रायडन कार्स मोठ्या वादात अडकला आहे. पाकिस्तानविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीपूर्वी कार्सला डर्बीच्या एका नाईट क्लबबाहेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. याबाबतचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. असे असले तरी कार्सला अटक करण्यात आलेली नाही. त्याला काही वेळाने सोडून देण्यात आले अन् तो टीम हॉटेलमध्ये परतला.



घटना शनिवार रात्री घडल्याचे सांगण्यात येत आहे. वृत्तानुसार ब्रायडन कार्सवर एका व्यक्तीने ड्रिंक्स सांडली होती. त्यानंतर इंग्लंडचा क्रिकेटपटू कार्स आणि त्या व्यक्तीमध्ये वाद झाला होता, मात्र यासाठी पोलीस बोलवण्यात आली नव्हती. हे पोलीस अधिकारी आधीपासूनच क्लबबाहेर उपस्थित होते. या वादात पोलिसांनी हस्तक्षेप करत कार्सला काही काळासाठी ताब्यात घेतले होते, मात्र त्याला अधिकृतरित्या अटक करण्यात आली नव्हती. या घटनेचे मुख्य कारण आणि पोलिसांनी कार्सला बेड्या ठोकण्याचा निर्णय का घेतला याबाबत अजून अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

### इसीबीची भूमिका

ब्रायडन कार्स इसीबीच्या केंद्रीय करारात सामील असलेला खेळाडू आहे. त्यामुळे तो जरी सध्या इंग्लंड संघाच्या ड्युटीवर नसला तरी तो अजून बोर्डाला बांधील आहे. इसीबीच्या प्रवयांनी सांगितले की, आम्हाला डर्बीमध्ये रात्री झालेल्या कथित घटनेची माहिती आहे. आम्ही याबाबत अधिक तपास करत आहे. शक्य झाले तर या प्रकरणाची पुढची माहिती दिली जाईल. दरम्यान, हे प्रकरण क्रिकेट रेग्युलेटरकडेदेखील पाठवले जाण्याची शक्यता आहे. त्यानंतरच कार्सवर कारवाई होणार की नाही हे समजेल.

## टीम हॉकी इंडियाला पुढच्या फेरीत जाण्याची संधी?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नेदरलँड्सकडून १-३ने झालेल्या पराभवामुळे भारतीय पुरुष हॉकी संघावर विश्वचषकातून बाहेर पडण्याचे संकट निर्माण झाले आहे. उपांत्य फेरी गाठण्याच्या त्यांच्या आशा जवळपास मावळल्या असल्या, तरी अर्जेंटिनाविरुद्धच्या अंतिम गट सामन्यापूर्वी संघाला एक मोठा दिलासा मिळाला आहे.

अर्जेंटिनाने इंग्लंडला ३-१ने हरवले, ज्यामुळे भारताला अंतिम चारमध्ये पोहचण्याचे दरवाजे पूर्णपणे बंद झालेले नाहीत, मात्र भारताचे भवितव्य आता केवळ त्यांच्या स्वतःच्या कामगिरीवर अवलंबून राहणार नाही. भारतीय संघाला २४ ऑगस्ट रोजी अर्जेंटिनाविरुद्ध केवळ विजयच नव्हे, तर मोठ्या फरकाने विजय मिळवणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे, तर नेदरलँड्स त्यांच्या शेवटच्या सामन्यात इंग्लंडला मोठ्या फरकाने हरवेल अशी प्रार्थना भारताला करावी लागेल.

## रोबोटने मोडला उसेन बोल्टचा विक्रम



**बीजिंग : वृत्तसंस्था**

चीनमधील एका ह्युमनॉइड रोबोटने अशी कामगिरी केली आहे, जी ऐकायला थोडी आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय आहे. त्याने १०० मीटरच्या शर्यतीत उसेन बोल्टचा विश्वविक्रम मोडला आहे. त्याने बोल्टपेक्षा कमी वेळात ही शर्यत पूर्ण केली.

'तियांगोंग अल्ट्रा' या ह्युमनॉइड रोबोटने बीजिंगमधील वर्ल्ड ह्युमनॉइड रोबोट गेम्सच्या प्राथमिक फेरीत १०० मीटर अंतर ९.३९ सेकंदांत पूर्ण केले. हा रोबोट बीजिंग ह्युमनॉइड रोबोट इनोवेशन सेंटरने विकसित केला आहे. विशेष म्हणजे, उसेन बोल्टने २००९मध्ये १०० मीटरच्या शर्यतीत नोंदवलेला विश्वविक्रम ९.३९ सेकंदांचा आहे. म्हणजेच आकडे पाहिल्यास समजते की, रोबोटने बोल्टपेक्षा ०.१९ सेकंद कमी वेळात शर्यत पूर्ण केली.

'तियानगोंग अल्ट्रा' हा एकटाच वेगवान रोबोट नव्हता. 'ऑनर' या चिनी स्मार्टफोन कंपनीने तयार केलेल्या 'लायटनिंग' नावाच्या आणखी एका रोबोटने १०० मीटरचे अंतर ९.४७ सेकंदांत पूर्ण केले, मात्र शर्यत संपल्यानंतर या रोबोटला स्ट्रेचरवरून बाहेर न्यावे लागले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com